सोलापूर
तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT



## महत्वाचे...

### सोलापुरात रविवारी सम्यक प्रज्ञा शोध परीक्षा

**सोलापूर, दि. २२ एप्रिल-**

क्रांतिसूर्य म. फुले आणि प्रज्ञासुर्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संयुक्त जयंतीनिमित्त सम्यक अकॅडमी आणि लोकराजा फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने सम्यक प्रज्ञा शोध परीक्षेचे रविवार २६ एप्रिल रोजी सकाळी १० वाजता आयोजन केल्याची माहिती राज्यकर निरीक्षक बुद्धजय भालशंकर यांनी दिली. १५ हजारांची शिष्यवृत्ती विजेत्या स्पर्धकांना देण्यात येणार आहे. ही परीक्षा जगताप क्लासेस, मॉडर्न शाळेसमोर, गांधी नगर येथे होणार आहे. परीक्षा लोकसेवा आयोगाच्या धर्तीवर वस्तुनिष्ठ बहुपर्यायी पद्धतीने घेण्यात येणार आहे. परीक्षेत सहभागी होण्यासाठी शैक्षणिक पात्रता १२ वी उत्तीर्ण असणे आवश्यक असून वयाची कोणतीही अट नाही. परीक्षेसाठी ऑनलाईन पद्धतीने नाव नोंदणी करायची असून परीक्षा फी आणि अधिक माहिती साठी बुद्धजय भालशंकर (मो.९९६०३७२७३६) अथवा आशुतोष तोंडसे (मो. ७०३८८८३३३९) यांचेशी संपर्क साधावा.

### वाहनांच्या मॅन्युअल योग्यता प्रमाणपत्रासाठी मुदतवाढ

**सोलापूर, दि. २२ एप्रिल-**

एटीएस' (ऑटोमॅटिक टेस्टिंग स्टेशन) प्रणाली अद्ययावत करण्याच्या प्रक्रियेमुळे वाहनांचे मॅन्युअल योग्यता प्रमाणपत्र नुतनीकरण काही कालावधीसाठी पूर्णतः बंद ठेवण्यात आले होते. यामुळे राज्यातील ११ प्रादेशिक परिवहन कार्यालयांच्या कार्यक्षेत्रातील सुमारे १५ लाख वाहतूक व्यावसायिकांना विविध अडचणींना सामोरे जावे लागत होते.सदर अडचणींचा विचार करून, वाहनधारकांना दिलासा देण्यासाठी मॅन्युअल योग्यता प्रमाणपत्र नुतणीकरणाची मुदत ३१ जुलै २०२६ पर्यंत वाढविण्यात आली आहे. सोलापूर जिल्ह्यातील सर्व वाहनधारकांना सूचित करण्यात येते की, ज्या वाहनांचे योग्यता प्रमाणपत्र कालबाह्य झाले आहे, त्यांनी तात्काळ प्रादेशिक परिवहन कार्यालय, सोलापूर येथे ऑनलाईन अपॉईंटमेंट घेऊन नुतनीकरणाची प्रक्रिया पूर्ण करावी. वाहनधारकांनी ही मुदतवाढ लक्षात घेऊन विलंब न करता आवश्यक ती कार्यवाही करावी, असे आवाहन प्रादेशिक परिवहन अधिकारी विजय पाटील यांनी केले आहे.

### वाहन धडकेत जखमी अठरा वर्षाच्या युवकाचा अखेर मृत्यू

**सोलापूर, दि. २२ एप्रिल-**

दुचाकी वाहनाच्या धडकेत जखमी झालेल्या शिरवळ येथील एका अठरा वर्षाच्या युवकाचा उपचारादरम्यान येथील शासकीय रुग्णालयात आज बुधवारी पहाटे मृत्यू झाला. चंद्रकांत रवींद्र अहिवळे ( वय १८ वर्षे, राहणार शिरवळ, तालुका अक्कलकोट) असे त्या मयत तरुणाचे नाव असून १६ एप्रिल रोजी रात्री साडेनऊ वाजता अक्कलकोट कडून शिरवळकडे दुचाकी वरून डबल शीट निघाला असताना वाटेत सांगवी कोळीबेट येथे समोरून येणाऱ्या दुसऱ्या दुचाकीने धडक दिली होती . यात जखमी झाल्याने त्याला अक्कलकोटच्या आरोग्य केंद्रात उपचार करून येथील शासकीय रुग्णालयात मित्र अभिषेक मोटे यांनी दाखल केले असता त्याचा आज बुधवारी पहाटे मृत्यू झाला.

### मुलीच्या छेडीवरून तरुणास कुऱ्हाड व लाकडाने मारहाण

**सोलापूर, दि. २२ एप्रिल-**

मुलीची छेड काढण्याच्या कारणावरून एका तरुणाला कुऱ्हाड व लाकडाने मारहाण करण्यात आल्याची घटना तुळजापूर तालुक्यातील सुरतगाव येथे आज बुधवारी सकाळी दहा वाजता घडली. गणेश विलास सुरते ( वय ३५ वर्ष, राहणार सुरत गाव) असे मारहाण झालेल्या त्या तरुणाचे नाव असून आज बुधवारी सकाळी राहत्या घराजवळ त्याला मुलीची छेड काढण्याच्या कारणावरून विशाल सुरते, श्याम सुरते यांनी कुऱ्हाड व लाकडाने मारहाण केली. यात डोक्याला व दोन्ही पायाला जखम झाल्याने त्याला उपचाराकरिता येथील शासकीय रुग्णालयात आई आशा सुरते यांनी दाखल केले.

### दारूच्या नशेत पत्नीला मारहाण

**सोलापूर, दि. २२ एप्रिल-**

दारूच्या नशेत एका पतीने आपल्या पत्नीला लाकडाने व लाथा बुक्क्यांनी मारहाण केल्याची घटना रेणुका नगर येथे मंगळवारी घडली. लक्ष्मीबाई शिवपुत्र टेंगले (वय ४१ वर्ष, रा. ८० रेणुका नगर, सोलापूर) असे मारहाण झालेल्या पत्नीचे नाव आहे.



मंगळवारी दुपारी घरामध्ये लक्ष्मीबाई यांचा पती शिवपुत्र हा वारंवार दारू पिऊन घरात येऊन त्यांना मारहाण केली. त्यामुळे उपचाराकरता येथील शासकीय रुग्णालयात त्या आज बुधवारी दुपारी स्वतः दाखल झाल्या.





# नारीशक्ती वंदन विधेयकाला विरोध करणाऱ्या विरोधी पक्षांचा निषेध

## भाजयुमोने घोषणाबाजी देत व्यक्त केल्या भावना

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ एप्रिल-**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील भाजपा सरकारने आणलेल्या नारीशक्ती वंदन विधेयकाला विरोध करणाऱ्या विरोधी पक्षांचा भारतीय जनता युवा मोर्चाने बुधवार, दि. २२ रोजी निषेध केला. येथील चार हुतात्मा पुतळा चौकात जोरदार घोषणाबाजी करून भाजपच्या कार्यकर्त्यांनी वातावरण दणाणून सोडले.

महिलांचा अपमान करणाऱ्या काँग्रेसचा धिक्कार असो, नारीशक्ती वंदन विधेयकाला विरोध करणाऱ्या विरोधी पक्षांचा धिक्कार असो, फुल नहीं चिंगारी है, ये भारत की नारी है, भारतमाता की जय, वंदे मातरम अशा घोषणा यावेळी देण्यात आल्या. भारतीय जनता युवा मोर्चाचे शहराध्यक्ष विजय कुलथे म्हणाले, मुख्यतः काँग्रेस आणि सर्वच विरोधी पक्षांची भूमिका आजवर महिला विरोधी राहिली आहे. काँग्रेस आणि विरोधी पक्ष महिला सक्षमीकरणाच्या गप्पा मारतात. परंतु महिलांसाठी योगदान देण्याची वेळ आली की, महिला विरोधी भूमिका घेतात, हे या प्रकरणातून पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे. महिलांना आरक्षण मिळवून देणाऱ्या विधेयकाचा विरोध करणे अत्यंत चुकीचे आहे. आगामी काळात जनता काँग्रेस आणि विरोधी पक्षांना याची शिक्षा नक्की देईल.

यावेळी किरण माशाळकर यांनीही भाषणातून विरोधकांचा निषेध केला. या निषेध आंदोलनाप्रसंगी नगरसेविका मृण्मयी गवळी, अनिल वंगारी, यतीराज होनमाने, अर्जुन मोहिते, राहुल डांगरे, विशाल बनसोडे, रोहन मराठे, ओंकार शिंदे, देवेंद्र डेरबेरे, अंबादास पामू, डोंगरेश चाबुकस्वार, नाजनीन शेख, सायरा शेख, किरण माशाळकर, ओंकार होमकर, गणेश पवार, अनिकेत प्रधाने, समर्थ लामकाने, श्रीनिवास दासरी, मयूर घुगे, राघव घनाते, लक्ष्मण सरवदे, ॲड. सतीशकुमार मालवी, सिद्धेश्वर माळी, नरेश दासरी, लखन भोसले, कृष्णा झंवर, रोहित गोरे, अनिल वंजारी, सागर राठी, विशाल अंबलगी, विकास करके, सुमित पतंगे, मंदार मेंडापुरे, रविराज वाघमोडे, प्रदीप मोरे, आकाश मुदगल आदी उपस्थित होते.

**खासदार प्रणिती शिंदेनी केला महिलांच्या मतांचा अपमान**

खासदार प्रणिती शिंदे यांनी महिला म्हणून या विधेयकाच्या बाजूने उभे राहण्याची आवश्यकता असताना त्यांनीही या विधेयकाला विरोध करून महिलांचा विश्वासघात केला आहे. सोलापूर लोकसभा मतदारसंघातील अनेक महिलांनी देखील खासदार शिंदे यांना मत दिलेले आहे. अशावेळी खासदार शिंदे यांनी विधेयकाला विरोध करून महिलांनी दिलेल्या मताचा अपमान केला, असे शहराध्यक्ष कुलथे म्हणाले.

# महिलांसाठी राज्यस्तरीय व्हिजन एक्स्पो

## सहकार भारतीतर्फे २४ ते २६ एप्रिल दरम्यान नॉर्थकोटवर आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ एप्रिल-**

महिलांचे संघटन, महिलांचा आर्थिक विकास या हेतुने सोलापूर जिल्हा सहकार भारतीच्या वतीने राज्यस्तरीय व्हिजन एक्स्पो फॉर वुमेन एम्पावरमेंट या संकल्पनेतून महिलांकडून उत्पादित वस्तुचे प्रदर्शन आणि विक्री नॉर्थकोट मैदानावर २४ ते २६ एप्रिल दरम्यान सकाळी ११ ते रात्री ९ या वेळेत आयोजन केल्याची माहिती या एक्स्पोच्या स्वागताध्यक्षा सुधा अळ्ळीमोरे यांनी दिली.

महिलांना सक्षम करण्यासाठी एक पाऊल या धर्तीवर या व्हिजन एक्स्पोचे आयोजन करण्यात आले असून महिलांकडून उत्पादित वस्तुला व्यासपीठ मिळावे म्हणून या प्रदर्शनातील स्टॉल मोफत उपलब्ध करून देण्यात आले आहे. महिलांसाठी असणाऱ्या साड्या, ड्रेस, विविध प्रकारचे आभुषणे, पर्स पासून ते सर्वच वस्तु तसेच खाद्य पदार्थ असा या व्हिजन एक्स्पो मध्ये सहभाग असणार आहे.

तसेच महिलांसाठी परिसंवादाचेही यामध्ये आयोजन करण्यात आले आहे. राज्यातील विविध जिल्ह्यातील महिलांकडून यामध्ये १०० पेक्षा अधिक स्टॉल्स स्टॉल्स लावण्यात येणार आहे. या मध्ये महिलांनी मोठ्यासंख्येने सहभागी व्हावे असे आवाहनही अळ्ळीमोरे यांनी केले. सहकार भारतीचे विभाग प्रमुख संतोष गायकवाड, कार्यकारणी सदस्य सुर्यकांत पाटील, जिल्हा अध्यक्ष किरण करकमकर, महामंत्री यशवंत बुर्हाडे, कार्यक्रम प्रमुख प्राची धामणगांवकर, सुजाता इनामदार, डॉ. जयंत शेळगीकर, अर्चना कुलकर्णी, श्रुती पवार, हनुमंत कोळी, आरती पानगांवकर, कुमुद अंकाराम यांच्यासह सहकार भारतीचे सर्व पदाधिकारी कार्यकर्ते काम करीत आहेत.

**मंत्री मेघना बोर्डीकर, चित्रा वाघ यांची उपस्थिती**

या व्हिजन एक्स्पोला राज्याच्या महिला बाल कल्याण मंत्री मेघना बोर्डीकर तसेच आ.चित्रा वाघ, सोलापूरचे पालकमंत्री जयकुमार गोरे, आ.देवेंद्र कोठे, महापौर विनायक कोंड्याल, शहाजी पवार, सहकार भारतीचे प्रदेश महामंत्री विवेक जुगादे, प्रदेश संघटक शरद जाधव यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती राहणार आहे. २४ एप्रिल रोजी या व्हिजन एक्स्पोचे उदघाटन आ.चित्रा वाघ यांच्या हस्ते होणार असून याचा समारोप २६ एप्रिल रोजी पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या हस्ते होणार आहे.

# 'इनोव्हा कारचा हट्ट नाही'

- 'एक्सयूव्हीत बसण्याचं भाग्यही मोठं'
- झेडपी अध्यक्ष दीपक वैद्य यांचे स्पष्टीकरण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२२ एप्रिल-**

सोलापूर जिल्हा परिषदेच्या अध्यक्षांच्या वाहनप्रकरणी सुरू असलेल्या चर्चेला अखेर पूर्णविराम मिळाला असून, अध्यक्ष दीपक वैद्य यांनी मी शेतकऱ्याचा मुलगा आहे, इनोव्हा कारसाठी हट्ट करणार नाही, असे स्पष्ट शब्दांत सांगितले आहे.



माध्यमांमध्ये प्रसिद्ध झालेल्या बातम्यांनंतर त्यांनी पत्रकारांशी संवाद साधत भूमिका मांडली. जिल्हा परिषदेच्या अध्यक्षपदाची सूत्रे स्वीकारून दोन महिने पूर्ण झाले असले, तरी यापूर्वीच्या अध्यक्षांची सफारी गाडी जीर्ण झाल्याने वैद्य यांच्याकडे अधिकृत वाहन उपलब्ध नव्हते. त्यामुळे सध्या ते भाड्याच्या इनोव्हा कारचा वापर करत आहेत. दरम्यान, जिल्हा परिषदेच्या प्रशासनाकडून अध्यक्ष, उपाध्यक्ष व इतर पदाधिकाऱ्यांसाठी नव्या वाहन खरेदीची प्रक्रिया सुरू आहे. कोणती वाहने घ्यायची याचा निर्णयही झाला असून त्यासाठी ऑर्डर देण्यात आल्याची माहिती उपाध्यक्ष इंद्रजीत पवार यांनी दिली आहे. याच पार्श्वभूमीवर 'झेडपी अध्यक्षांचा इनोव्हा कारसाठी हट्ट' अशा आशयाच्या बातम्या समोर आल्या होत्या. त्यावर प्रतिक्रिया देताना दीपक वैद्य म्हणाले, मुख्यमंत्री फडणवीस आणि पालकमंत्री गोरे यांनी शेतकऱ्याचा मुलगा म्हणून माझ्यावर विश्वास ठेवत मला अध्यक्षपदाची जबाबदारी दिली. गाडी कोणतीही असो, मला पदाची जबाबदारी महत्त्वाची आहे. ते पुढे म्हणाले, अध्यक्ष व उपाध्यक्षांसाठी मंजूर बजेटनुसार महिंद्रा कंपनीची एक्सयूव्ही घेण्याचे आधीच ठरले आहे. एक्सयूव्हीत बसण्याची संधी मिळणंही माझ्यासाठी मोठी गोष्ट आहे.

त्यामुळे कोणत्याही गाडीसाठी मी हट्ट धरलेला नाही. या स्पष्टीकरणानंतर वाहनप्रकरणी सुरू असलेल्या चर्चांना विराम मिळण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

## दिव्यांगांसाठी राज्य सरकारचा मोठा निर्णय

# 'कल्याण'ऐवजी आता 'सक्षमीकरण' विभाग

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२२ एप्रिल-**

दिव्यांग व्यक्तींच्या हक्कांचे संरक्षण, सन्मान आणि स्वावलंबन वाढवण्यासाठी महाराष्ट्र शासनाने महत्त्वपूर्ण प्रशासकीय निर्णय घेतला आहे. राज्यातील 'दिव्यांग कल्याण विभागा'चे नाव बदलून आता 'दिव्यांग सक्षमीकरण विभाग' असे करण्यात आले आहे. दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ ची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी हा निर्णय घेतल्याचे सांगण्यात आले आहे.





या बदलासोबत विभागाच्या प्रशासकीय रचनेतही मोठे बदल करण्यात आले असून, एकूण २१०५ पदांच्या सुधारित आकृतिबंधास मंजुरी देण्यात आली आहे. त्यानुसार राज्यातील प्रत्येक जिल्ह्यासाठी स्वतंत्र दिव्यांग सक्षमीकरण कार्यालय कार्यरत राहणार असून, प्रत्येक जिल्ह्यात ५१ अधिकारी-कर्मचारी असणार आहेत. दरम्यान, कल्याणकारी' नव्हे, 'हक्क आधारित' विचार असा राज्य शासनाचा हा निर्णय आहे.

**सीईओंकडे जिल्हास्तरीय जबाबदारी**

मुंबई शहर आणि मुंबई उपनगर या दोन जिल्ह्यांमध्ये जिल्हाधिकारी हे कार्यालयप्रमुख असतील. तर उर्वरित महाराष्ट्रातील जिल्ह्यांमध्ये जिल्हा परिषदेचे सीईओ संबंधित कार्यालयाचे प्रमुख म्हणून काम पाहतील. यामुळे प्रशासनाच्या माध्यमातून योजनांची अंमलबजावणी अधिक वेगाने होण्याची अपेक्षा आहे.

**नवीन पदनिर्मितीला मंजुरी**

सुधारित रचनेनुसार राज्यभरात १४५८ नियमित पदे मंजूर करण्यात आली आहेत. तर ६४७ पदे बाह्य स्रोतांद्वारे भरली जाणार आहेत. यामध्ये वाहनचालक, बहुउद्देशीय कर्मचारी, तांत्रिक सहाय्यक, दुभाषी, शिपाई आणि सफाईगार यांचा समावेश आहे. या कर्मचाऱ्यांची नियुक्ती एकत्रित मानधनावर होणार आहे.याशिवाय २०१ नवीन पदांची निर्मिती करण्यात आली असून, कालबाह्य ठरलेली १४० पदे मृत संवर्ग म्हणून घोषित करण्यात आली आहेत.







# आंदोलनाचा दुसरा दिवस; कामाचा खोळंबा

- अत्यावश्यक सेवेतील कर्मचाऱ्यांना वगळून शासकीय-निमशासकीय कर्मचारी संपावर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ एप्रिल-**

राज्य सरकारी कर्मचाऱ्यांच्या १८ प्रलंबित मागण्यांसाठी मंगळवार (दि.२१) पासून बेमुदत संप पुकारण्यात आला असून, आज संपाचा दुसरा दिवस आहे. संपाच्या दुसऱ्या दिवशीही कर्मचाऱ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत १०० टक्के यश मिळवल्याचा दावा पदाधिकारी संघटनांनी केला आहे.

दरम्यान, यामधून शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी मात्र माघार घेतली आहे आणि संपावर असूनही छत्रपती शिवाजी महाराज शासकीय रूग्णालयातील पोस्टमार्टम, ऑक्सिजन पुरवठा विभाग, जिल्हाधिकारी कार्यालयातील ध्वज चढविणे आणि उतरवणारे कर्मचारी आपले दैनंदिन कर्तव्य पार पाडीत असल्याची माहिती महसूल संघटना पदाधिकाऱ्यांनी दिली.

दरम्यान, या मागण्यांबाबतचे निवेदन जिल्हाधिकाऱ्यां मार्फत शासन स्तरावर पाठविण्यात आले आहे. संपामुळे दिवसभरातील सरकारी कार्यालयांमधील कामकाजावर परिणाम होण्याची शक्यता असून, सामान्य नागरिकांची कामे खोळंबण्याची चिन्हे आहेत. या संपात महसूल विभाग, कारागृह विभाग, वाहन चालक संघटना, लेखा व कोषागार विभाग, आय.टी.आय., आरोग्य विभाग, तालुका स्तरीय कर्मचारी सहभागी झाले आहेत. जोपर्यंत मंजूर केलेल्या मागण्यांचे शासन निर्णय (जीआर) अधिकृतपणे निर्गमित होत नाहीत, तोपर्यंत हा लढा मागे घेतला जाणार नाही, असा निर्धार आंदोलकांनी व्यक्त केला आहे.

विविध आंदोलनांनंतर शासनाकडून चर्चेचे आश्वासन देण्यात आले होते. मात्र अद्याप कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नसल्याचा आरोप विविध संघटना पदाधिकाऱ्यांनी केला आहे. दरम्यान, सुधारित राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजना जाहीर होऊनही तिची अंमलबजावणी झालेली नाही. त्यामुळे १ मार्च २०२४ पासून निवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांचे पेन्शन प्रलंबित असून, त्यांना तात्पुरते निवृत्ती वेतनही मिळालेले नाही, ही गंभीर बाब असल्याचे संघटनेने नमूद केले आहे. तसेच राज्यातील रिक्त पदे भरण्यात होणारा विलंब, कंत्राटी कर्मचाऱ्यांचे नियमितीकरण, अनुकंपा तत्त्वावरील नियुक्त्या, सेवानिवृत्तीचे वय ६० वर्षे करण्याची मागणी आणि शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे प्रलंबित प्रश्न तातडीने सोडवावेत, अशी मागणी करण्यात आली आहे.शासनाने या सर्व मागण्यांवर सकारात्मक निर्णय घ्यावा, असेही आवाहन संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

संप यशस्वी करण्यासाठी समन्वय समितीचे निमंत्रक अशोक इंदापुरे, अध्यक्ष शंतनू गायकवाड, राज्य मध्यवर्ती कर्मचारी संघटना अध्यक्ष राजीव साळुंखे, सरचिटणीस अमृतराव कोकाटे, कोषाध्यक्ष नरेश बोनाकृती, कार्याध्यक्ष गजानन गायकवाड, संघटक किशोर सावळे, दीपक पुजारी, मंजुनाथ गायकवाड, देवा शिंदे, अमोल गायकवाड, समीर हुडिवाले, विजय भांगे, रवि नष्टे, जमादार बाळकृष्ण पुतळे, खंडू भोसले, नितीन कसबे, सुनिल बोलाबत्तीन पंकज जाधव, विनायक पाटील, कुलदीप गवळी व इतर पदाधिकाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

**संपात असूनही हे कर्मचारी आहेत कर्तव्यावर**

छत्रपती शिवाजी महाराज रूग्णालयातील पोस्टमार्टम विभागातील कर्मचारी संतोष बनसोडे, सुमित पारचा, ऑक्सिजन पुरवठा विभागातील कर्मचारी यशपाल साबळे, संदेश कांबळे, अशोक कांबळे, योगेश बारसकर, उदवाहक (लिफ्ट) योगेश मोरे, जिल्हाधिकारी कार्यालयातील राष्ट्र ध्वज चढवणे व उतरवणे हे काम करणारे शिपाई शेख हे संपावर असून कर्तव्य पार पाडीत आहेत. यामुळे वरिष्ठ अधिकारी वर्गातून त्यांचे कौतुक होत आहे.

# अन्न व औषध प्रशासनाचा दोन पान टपऱ्यांवर छापा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२२ एप्रिल-**

येथील अन्न व औषध प्रशासन विभागाच्या पथकाने शहरातील दोन वेगवेगळ्या पान टपऱ्यावर धाड टाकून शासनाने प्रतिबंधित केलेला गुटखा, पान मसाला, सुगंधी सुपारी जप्त करून दोघा जणांविरुद्ध जेल रोड पोलीस ठाण्यात वेगवेगळे गुन्हे दाखल केले आहेत. मोजीज उस्मान शाभाई (रा. ३९, तेलंगी पाच्छा पेठ, सोलापूर) आणि ईस्माईल इब्राहिम रंगरेज (वय ३०, रा. ३२० शनिवार पेठ, सोलापूर) असे गुन्हा दाखल करण्यात आलेल्या त्या दोन पान टपरी चालकांचे नाव असून याबाबत अन्न व औषध प्रशासन विभागातील कर्मचारी नंदिनी सिध्देश्वर हिरेमठ यांनी फिर्याद दिली आहे.



अन्न व औषध प्रशासनाने दि. २१ एप्रिल रोजी दुपारी तेलंगी पाच्छा पेठ येथील मोजीज शाभाई याच्या जनता पान शॉप वर धाड टाकली असता शासनाने प्रतिबंधित केलेला तयार मावा, हाय गुटखा, डायरेक्टर पानमसाला, आरएमडी पानमसाला, एम सेंटेड सुगंधित तंबाखू, राजनिवास पानमसाला, विमल पानमसाला, शॉट ९९९ सुगंधित तंबाखू असे पाच हजार रुपये किमतीचा मुद्देमाल तसेच त्याच दिवशी साखरपेठ येथील ईस्माईल रंगरेज याच्या मालकीच्या रंगरेज पान शॉप मधुन २ हजार ३९३ रुपये किमतीचा मिराज, हाय गुटखा, सुगंधित तंबाखू, विमल पानमसाला, शॉट राजु ईलायची सुपारी असा प्रतिबंधित माल मिळून आला. तपास सहाय्यक पोलिस निरीक्षक पाटील करीत आहेत.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



## ज्ञानामृत आनंदलहरी १४२०

**दीपु ठेविला परिवरीं । कवणातें नियमी ना निवारी ।
आणि कवण कवणिये व्यापारीं । राहाटे तें हि नेणे ।।**

मी आणि प्राणीमात्र वेगळे नाहीत, असे स्पष्टीकरण भगवंतांनी अर्जुनाला दिले. ही सर्व भूतमात्र प्रकृतीच्या आधीन आहेत. पंचम हाभूतात्मक आकाराने ही प्रकृती बनत असते. एखादे शहर, गांव राजाने निर्माण केले असे लोक म्हणतात, पण प्रत्यक्षात ते निर्माण करण्यासाठी दगड, माती राजा उचलत असतो ए१फऋफ? त्याप्रमाणे लोक, मी हे सर्व जग निर्माण केले म्हणतात. विरजणाच्या संगतीने दूध घट्ट होऊ लागते. किंवा बियाला पाण्याचा सहवास मिळाला तर त्यास अंकुर फुटतात. त्याप्रमाणे प्रकृतीला माझा सहवास लाभतो व त्या सहवासाने प्रकृती जगदत्पतीपणाच्या आकारात शिरते. भूतसृष्टी निर्मीतीसाठी मला कांही करावे लागत नाही. ज्याप्रमाणे सत्ता द्वारा अंगीकारलेली प्रजा आपल्या नेमून दिलेल्या कार्यात मग्न असते, त्याप्रमाणे ही प्रकृती सर्व करीत असते. स्वप्नाला कारण जशी झोप असते, तसे भूतमात्र निर्मितीला कारण प्रकृती आहे. बिजापासून वृक्ष, वेली तयार होतात, त्यांना आश्रय देण्यास भूमी जसी समर्थ असते, तसे या सर्व जीवांचे अस्तित्व प्रकृतीच्या आधीन आहे. जड आणि चेतन, स्थुल आणि सूक्ष्म या सर्व प्रकारच्या गोष्टींना प्रकृतीच.मूळ कारण असल्याने प्राणीमात्र निर्माण करणे किंवा त्यांचे रक्षण करणे ही कार्य माझ्याकडे येत नाहीत. असे भगवंत म्हणाले.



मी जरी प्राणीमात्रामध्ये असलो तरीही मी कांही करीत नाही व कोणाकडून कांही करुन घेत नाही. प्राणीमात्राच्या कार्यात मला अडकवण्याचे कारण नाही. याचे स्पष्टीकरण करतांना भगवंत म्हणाले, दीपु ठेविला परिवरीं । कवणातें नियमी ना निवारी । आणि कवण कवणिये व्यापारीं । राहाटे तें हि नेणे ।। अर्थात जसे घरात ठेवलेला दिवा कोणी काय कार्य करावे हे सांगत नाही किंवा हे कार्य करा, ते कार्य करा असे प्रवृत्त करीत नाही. त्याच्या प्रकाशात ज्याला जे योग्य वाटेल ते कार्य जो तो करतो. त्यांच्या कर्माला, कार्याला दिवा कारणीभूत आहे असे म्हणणे संयुक्तीक नाही. तसेच प्राणीमात्राकडून होणा-या कार्याला मला जबाबदार धरणे योग्य नाही. प्रत्यक्षात माझे स्वतंत्र असे मानवी देहाप्रमाणे स्वरुपच नाही. तरीपण लोक मला देहधारी समजतात. मी निर्गुण असतांनाही मला सगुणरुप पाहतात. प्राणीमात्रापेक्षा माझे अस्तित्व वेगळे समजतात. माझ्या मूर्ती तयार करुन मंदिरे बांधतात. त्या मुर्तीला देव म्हणून पूजा करतात. तीच मुर्ती दुभंगली तर हा देव नाही म्हणून त्या दुभंगलेल्या मूर्तीला टाकून देतात. लोक मला वेगवेगळया जातीधर्माचा मानतात. मी सर्वत्र सदा सम असणारा, सर्व प्राणीमात्रात असणारा असतांनाही मी एखादया विशिष्ट ठिकाणी आहे. असे समजून तेथेच माझे अस्तित्व पाहतात. प्राणीमात्रांची सेवा सोडून मला एखादया ठिकाणी कल्पून त्या ठिकाणी पूजा-पाठ करीत बसतात. भगवंताच्या एवढया सर्व सांगण्यापाठीमागचा अर्थ असा आहे की, सर्व प्राणीमात्र हे चालते बोलते ईश्वर असतांनाही माणूस या जीवांशी नको त्या पध्दतीने वागतो आणि ईश्वराला नको त्या ठिकाणी पाहून त्याचे अस्तित्व मानतो. चुकीचे कार्य आपण स्वत: करतो आणि ही कार्य भगवंतानी करुन घेतली म्हणून माणूस त्यातून मोकळा होण्याचा प्रयत्न करतो. थोडक्यात, जर भगवंत सर्वत्र भरुन उरला आहे तर तो प्राणीमात्रात आहेच, याची जाणीव असायला हवी. जय जय राम कृष्ण हरी।

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

वार : गुरुवार,
दि. २३ एप्रिल २०२६
विक्रम संवत् २०८३ ।
शके -१९४८
संवत्सर - पराभव
मास - वैशाख
ऋतु - वसंत ।
नक्षत्र- पुर्नवसु (२०.५७)
योग - धृति (२७.३२)
करण - गरज (०९.४५)
राहू काल : गुरुवार
दु. १.३० ते ३.००

दिनविशेष :
गंगासप्तमी, गंगापूजन.
जागतिक पुस्तक दिन.
१६३५: अमेरिकेतील पहिली सार्वजनिक शाळा बोस्टन लॅटिन स्कूल स्थापन झाली.
१८१८: इंग्रज अधिकारी मेजर हॉल यास कर्नल प्रॉयर याने रायगड किल्ल्याची टेहळणी करण्यास पाठवले.
१९९०: नामिबियाचा संयुक्त राष्ट्रांत प्रवेश.



## गेनसिध्द महाराज मंदिराला जनरेटर अर्पण

**शिखर पहारिया फाउंडेशनचा स्तुत्य उपक्रम**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ एप्रिल-**

शिखर पहारिया फाउंडेशन यांच्या प्रयत्नांमुळे, ५८.५ घत क्षमतेचा सुमारे ९ लाख किंमतीचा किर्लोस्कर जनरेटर कुंभारी गाव, सोलापूर येथील पवित्र गेनसिद्ध महाराज मंदिराला अर्पण करण्यात आला.

हा जनरेटर मंदिराची दीर्घकालीन गरज पूर्ण करतो आणि दैनंदिन पूजा तसेच भक्तांच्या भेटीसाठी अखंड वीजपुरवठा सुनिश्चित करतो. कुंभारी गावातील संपूर्ण नागरिकांनी या अर्थपूर्ण योगदानाबद्दल अपार आनंद आणि कृतज्ञता व्यक्त केली. कार्यक्रमाची सुरुवात मंदिरात दिव्य पूजेसह झाली, ज्यामध्ये श्री गेनसिद्ध महाराजांचे आशीर्वाद घेतले गेले. त्यानंतर एक उबदार आणि मनापासूनचा समारंभ झाला, ज्यामध्ये गावकरी एकत्र येऊन या उदार उपक्रमाचा आनंद साजरा केला. कार्यक्रमाच्या शेवटी, कुंभारीतील लोकांनी शिखर पहारीया आणि फाउंडेशनच्या सर्व सदस्यांचे सामाजिक कार्य आणि सेवेसाठी केलेल्या सततच्या प्रयत्नांबद्दल अभिनंदन आणि आभार व्यक्त केले गेले.

## सोलापूर शहरासह जिल्ह्यातील पशुपालकांसाठी सुवर्णसंधी

# किसान क्रेडिट कार्डवर ३ लाखांपर्यंत कर्ज

### नियमित परतफेडीवर शून्य टक्के व्याजदराचा लाभ; जिल्ह्यात मोहीम सुरू

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ एप्रिल-**

पशुपालन व्यवसायाला आर्थिक चालना देण्यासाठी पशुसंवर्धन विभागातर्फे पशुसंवर्धन किसान क्रेडिट कार्ड (केसीसी) मोहीम राबविण्यात येत असून, जिल्ह्यातील पशुपालकांसाठी ही योजना मोठी संधी ठरत आहे. पशुधनाच्या देखभालीसाठी, खाद्य, औषधोपचार तसेच दैनंदिन खर्च भागविण्यासाठी या योजनेअंतर्गत तीन लाख रुपयांपर्यंत कर्ज आकर्षक व्याज सवलतीसह उपलब्ध करून दिले जात आहे.

ज्या शेतकऱ्यांकडे सध्या किसान क्रेडिट कार्ड नाही, अशा पात्र लाभार्थ्यांना १ लाख ६० हजार रुपयांपर्यंत विनातारण कर्ज दिले जाणार आहे. दूध संस्थेची किंवा दूध संघाची हमी असल्यास ही मर्यादा तीन लाख रुपयांपर्यंत वाढवता येणार आहे. तसेच, आधीपासून किसान क्रेडिट कार्ड असलेल्या शेतकऱ्यांनाही विद्यमान पतमर्यादा वाढवून घेण्याची संधी उपलब्ध आहे.

या कर्जाचा मूळ व्याजदर नऊ टक्के असला, तरी वेळेत आणि नियमित परतफेड करणाऱ्या



लाभार्थ्यांना केंद्र सरकारकडून तीन टक्के, राज्य सरकारकडून चार टक्के आणि बँकांकडून दोन टक्क्यांपर्यंत व्याज सवलत मिळू शकते. त्यामुळे लाभार्थ्यांना प्रत्यक्षात शून्य टक्के व्याजदराचा लाभ मिळण्याची शक्यता आहे. योजनेचा लाभ घेण्यासाठी लाभार्थ्याने केंद्र, राज्य किंवा जिल्हा परिषद योजनेतील अनुदानाचा लाभ घेतलेला नसावा. तसेच संबंधित लाभार्थ्यांच्या सर्व पशुधनाची भारत पशुधन (एनडीएलएम) पोर्टलवर नोंदणी असणे आवश्यक आहे. शासनाच्या अद्ययावत नियमांनुसार इतर अटींची पूर्तताही बंधनकारक राहणार आहे. योजनेअंतर्गत कुक्कुटपालन, दुग्धव्यवसाय, शेळी-मेंढीपालन, डुक्करपालन अशा विविध व्यवसायांना प्राधान्य देण्यात आले आहे. त्यासाठी २५ हजार मांसल कुक्कुट किंवा ५० हजार अंडी उत्पादक कुक्कुट, ४५ हजार क्षमतेपर्यंत हॅचरी युनिट, १०० पर्यंत दुधाळ जनावरे, ५०० पर्यंत मेंढी-शेळी आणि २०० पर्यंत वराह अशी कमाल मर्यादा निश्चित करण्यात आली आहे. विशेष म्हणजे, सन २०२६-२७ पासून मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजना अंतर्गत पात्र लाभार्थ्यांना या क्रेडिट कार्डद्वारे खेळते भांडवल उपलब्ध होणार आहे. राज्यातील १० लाख पशुपालकांना या उपक्रमात समाविष्ट करण्याचे उद्दिष्ट शासनाने ठेवले आहे. अधिक माहितीसाठी १९६२ हेल्पलाइनवर माहिती घ्यावी, असे आवाहन पशुसंवर्धन विभागाने केले आहे.

> छोट्या पशुपालकांकडे भांडवलाची कमतरता असल्याने ही योजना त्यांच्यासाठी मोठा आर्थिक आधार ठरणार आहे. वेळेत कर्जफेड केल्यास व्याज सवलतीचा लाभ मिळणार असून, ऑनलाइन व ऑफलाइन अर्जाची सुविधा उपलब्ध आहे. अधिकाधिक पात्र लाभार्थ्यांनी या योजनेचा लाभ घ्यावा.
>
> **- डॉ. अनिल तांबे,**
> उपायुक्त, पशुसंवर्धन व दुग्धविकास.

## अमृतवचन : जैन मुनी वीरसागर महाराज

### समर्पण भावना हीच यशाची गुरुकिल्ली



श्रावकांनी आपल्या प्रगतीसाठी जीवनात समर्पण भावना ठेवणे आवश्यक आहे. स्वतःची किंमत ओळखून, कमतरता नष्ट करत सकारात्मक विचारांची कास धरली तरच प्रगतीचे ध्येय गाठता येते, असे प्रतिपादन परमपूज्य १०८ निर्यापक मुनीश्री वीरसागरजी महाराज यांनी केले. वालचंद इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी येथील दिगंबर जैन मंदिरात आयोजित ग्रीष्मकालीन वाचन कार्यक्रमांतर्गत ते बोलत होते.

पिरॅमिडचे उदाहरण देत मुनीश्री म्हणाले, ''ज्याप्रमाणे पिरॅमिडचा तळ मोठा आणि वरचे टोक एका सूक्ष्म बिंदूएवढे असते, त्याप्रमाणे व्यक्तीने आपले विचार मोठे ठेवावेत जेणेकरून सूक्ष्म ध्येय गाठता येईल. गर्दीचा हिस्सा बनण्यापेक्षा बलिदानासाठी समर्पणाची तयारी ठेवा. परिपूर्ण कोणीही नसतो, जर आपण परिपूर्ण असतो तर आज देव झालो असतो. त्यामुळे अंतर्मनात सकारात्मकता बिंबवणे गरजेचे आहे. सध्याच्या धावपळीच्या आणि ताणतणावाच्या युगात सातत्य राखण्यासाठी कम्फर्ट झोनमधून बाहेर पडण्याचे आवाहन त्यांनी केले. कठीण मार्ग ओळखून त्यावर मार्गक्रमण करा. लोक काय म्हणतील याकडे दुर्लक्ष करून वेळेचे योग्य नियोजन करा, असा मोलाचा सल्ला त्यांनी उपस्थितांना दिला. मुनीश्रींनी मोबाईलचा अतिवापर आणि फालतू गप्पांवर वेळ वाया घालवण्यापेक्षा स्वतःच्या ध्येयावर लक्ष केंद्रित करण्यास सांगितले. ते म्हणाले, ''रोज सकाळी उठल्यावर ॐ काराचा जप, मेडिटेशन आणि व्यायाम करा. व्यायामामुळे मानसिकता बदलते, शरीरातील कमकुवतपणा दूर होतो आणि मेंदूतील न्यूरल पाथवे सक्रिय होऊन सकारात्मक ऊर्जा मिळते. वाणी पवित्र करण्यासाठी आणि सरस्वतीच्या आराधनेसाठी ॐ ऐं नमः या मंत्राचा तसेच भक्तामर स्तोत्रातील सहाव्या श्लोकाचा (अल्पश्रुतं श्रुतवतां...) रोज जप करावा, असे त्यांनी सूचविले.



## जेईई मेनमध्ये 'वालचंद'ची कामगिरी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ एप्रिल-**

गुणवत्तापूर्ण शिक्षण, सातत्यपूर्ण मार्गदर्शन आणि विद्यार्थीकेंद्रित उपक्रमांचा उत्कृष्ट संगम साधणाऱ्या वालचंद कॉलेज ऑफ आर्ट्स अँड सायन्सने यंदाच्या जेईई मेन परीक्षेत उल्लेखनीय यशाची नवी उंची गाठली आहे. महाविद्यालयातील १० विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट गुणांसह जेईई ॲडव्हान्सड परीक्षेसाठी पात्रता मिळवत संस्थेच्या शैक्षणिक परंपरेला पुन्हा एकदा राष्ट्रीय पातळीवर अधोरेखित केले आहे.

या यशामध्ये अनिकेत खडके (९९.५५, ई डब्ल्यू एस - रँक ८८१) यांनी आघाडी घेत प्रभावी कामगिरी केली. त्याचबरोबर रेवनेश सुतार (९८.२५, ओबीसी), मुहम्मद उस्मान मुल्ला (९५.५५, जनरल), स्वयं व्हनकुद्रे (९४.३३, ओबीसी) आणि समर्थ एडके (९२.८६, ओबीसी) यांनीही उल्लेखनीय यश संपादन करत स्पर्धात्मक परीक्षांमध्ये आपली छाप उमटवली. तसेच वासू लाडे (८८.३६), झियान चौधरी (८६.२५), प्रणव साखरे (८३.९८), गायत्री ढंगे (८०.९५) आणि अंकिता महेशन (८०.९२) या विद्यार्थ्यांनीही कामगिरी करत महाविद्यालयाच्या गुणवत्तेला न्याय दिला. यशस्वी विद्यार्थ्यांचे वालचंद शिक्षण समूहाचे समस्त विश्वस्त, प्राचार्य डॉ. संतोष कोटी, उपप्राचार्य अनुप म्हेत्रे, डॉ. जीवराज कस्तुरे आणि समन्वयिका सारिका महिंद्रकर यांनी अभिनंदन केले.

## पाणंद रस्त्यांसाठी मोठ्या उपाययोजनांची गरज

### पंचायत समितीच्या बैठकीत आ. पाटील यांची अपेक्षा

**तभा वृत्तसेवा,**
**जेऊर, दि. २२ एप्रिल-**

करमाळा मतदार संघातील शेतकऱ्यांची पाणंद रस्त्याची मागणी पाहता प्रशासनाकडून मोठ्या प्रमाणावर उपाययोजना होणे गरजेचे असल्याची अपेक्षा आमदार नारायण (आबा) पाटील यांनी व्यक्त केली.

करमाळा पंचायत समितीच्या सभागृहात आढावा बैठकीत ते बोलत होते. मातोश्री ग्राम समृध्दी शेत व पाणंद रस्ते योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी तालुकास्तरीय बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. करमाळा तालूक्याच्या तहसिलदार शिल्पा ठोकडे यांच्या नियोजनातून ही बैठक पार पडली.

यावेळी कुर्डुवाडी-माढा विभागाच्या उपविभागीय अधिकारी (प्रांत अधिकारी) जयश्री आव्हाड, माढाचे तहसिलदार संजय आदिनाथ कारखान्याचे संचालक देवानंद बागल, संचालक राजाभाऊ कदम, रविकिरण फुके, अतुल पाटील, धनंजय शिरस्कर, पंचायत समिती सदस्य स्वप्नील काळे, विनोद गरड, जयदरथ शिंदे, आमदार पाटील यांचे स्वीय सहाय्यक संजय फडतरे, सूर्यकांत पाटील उपस्थित होते.

यावेळी आमदार पाटील यांनी मतदारसंघातील प्रत्येक गावात मुख्यमंत्री बळीराजा शेत पाणंद रस्त्याबाबत आढावा घेण्यात याव्यात. तसेच गावातील ग्रामपंचायत सरपंच यांनी पोलीस बंदोबस्त सोबत घेऊन त्या-त्या गावचे रस्ते अतिक्रमण काढणे, रस्ते नकाशावर घेणे,चालू रस्ते पहाणे, शेतकऱ्यांनी बंद केलेले रस्ते पुन्हा चालू करण्यासाठी सर्व अधिकाऱ्यांना सूचना केल्या.



> **नवीन प्रशासकीय इमारतीच्या जागेची पाहणी**
>
> मातोश्री ग्राम समृध्दी शेत व पाणंद रस्ते योजना आढावा बैठकीनंतर आमदार पाटील यांनी तहसिल कार्यालयाच्या परिसरात नियोजित नुतन प्रशासकीय भवनाच्या बांधकामासाठी आरक्षित केलेल्या जागेची पाहणी केली. या पूर्वी नवीन प्रशासकीय इमारत ही करमाळा शहराच्यापासून दूर बांधण्याचे नियोजन केले गेले होते परंतु आमदार पाटील यांनी त्यावेळी यास विरोध करुन शहराच्या सोयीने आहे त्याच ठिकाणी नवीन प्रशासकीय इमारत बांधण्याची मागणी केली होती. यामुळे आज आमदार पाटील यांनी स्वतः या नियोजित व आरक्षित जागेची पाहणी केली.

## शिस्त अन् चिकाटीमुळे यश प्राप्ती : बिद्री

### शाळेत १०० टक्के उपस्थित विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ एप्रिल-**




सहस्त्रार्जुन शैक्षणिक संकुलातील शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये वर्षभर १०० टक्के उपस्थिती राखणाऱ्या विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा पार पडला. चालू शैक्षणिक वर्षातील तब्बल १०१ विद्यार्थ्यांना १०० टक्के उपस्थिती बाबत सन्मान चिन्ह, सन्मानपत्र व भेटू वस्तू देऊन गोरविण्यात आले.

शैक्षणिक संस्थेचे अध्यक्ष राजुसा भुमकर व परिवाराच्या वतीने सर्व १०१ विद्यार्थ्यांना भेटू वस्तू देण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष संजीवसा बिद्री हे होते. तसेच प्रमुख पाहुणे म्हणून सहस्त्रार्जुन शैक्षणिक संस्थेचे अध्यक्ष राजुसा भुमकर यांची उपस्थिती लाभली होती. याप्रसंगी व्यासपीठावर संस्थेचे सचिव जयकुमारसा कोल्हापुरे, शैक्षणिक संस्थेचे सचिव गजाननसा गोयल,संस्थेचे सदस्य सुरेशसा बिद्री, शिरीषसा कोल्हापुरे, गणेशसा दामजी, शैक्षणिक संस्थेचे सदस्य तुकाराम पवार, मुख्याध्यापक मोरेश्वर काटवे, मुख्याध्यापिका मंजुषा माने, मुख्याध्यापिका विजयालक्ष्मी बिराजदार, सविता हातवळणे आदींची उपस्थिती लाभली होती. वर्षभर एकही दिवस गैरहजर न राहता शाळेत हजेरी लावणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र, सन्मानचिन्ह व पुष्पगुच्छ देऊन गौरविण्यात आले. सूत्रसंचालन व यादी वाचन सहशिक्षक अनिल गायकवाड यांनी केले तर आभार सहशिक्षक महेश काळे यांनी मानले.



## वाहतूक संघटना संयुक्त महासंघाच्या १६१ व्या रिक्षा स्टॉपचे उद्घाटन

**सोलापूर, दि. २२ एप्रिल-**

वाहतूक संघटना संयुक्त महासंघाच्या वतीने १६१व्या रिक्षा स्टॉपचे उद्घाटन मोठ्या उत्साहात संपन्न झाले. छत्रपती संभाजी तलाव येथील रिक्षा स्टॉपचे उद्घाटन अतिक्रमण अधिकारी जगन्नाथ बनसोडे आणि महासंघाचे प्रदेशाध्यक्ष रियाज सय्यद यांच्या हस्ते करण्यात आले.

अतिक्रमण अधिकारी जगन्नाथ बनसोडे यांनी सांगितले की, कोणत्याही प्रकारचा त्रास होत असल्यास ते चालकांसोबत ठामपणे उभे राहतील. नियमांनुसार कारवाई करण्यासाठी आपण तत्पर असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. या कार्यक्रमाला प्रदीप शिंगे, इम्रान शेख, शंकर राऊत, तुफान शेख, अमीन पटेल, सचिन शिर्के, मनोहर खांडेकर, स्टॉप अध्यक्ष मुखदुम शेख, अजहर शेख उपस्थित होते.

## आरटीई प्रवेशाची अंतिम संधी; सोलापुरात ९६५ जागा अद्याप रिक्त

### ३० एप्रिलपर्यंत मुदत, १,७०६ विद्यार्थ्यांचे प्रवेश पूर्ण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ एप्रिल-**

मोफत शिक्षणाचा अधिकार (आरटीई) अंतर्गत आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांना खासगी (सेल्फ फायनान्स) शाळांमध्ये मोफत प्रवेश दिला जात आहे. सोलापूर जिल्ह्यात आतापर्यंत १ हजार ७०६ विद्यार्थ्यांचे प्रवेश पूर्ण झाले असून, अजूनही ९६५ जागा रिक्त आहेत. पात्र विद्यार्थ्यांच्या पालकांना ३० एप्रिलपर्यंत प्रवेश प्रक्रिया पूर्ण करण्याची संधी उपलब्ध आहे.

सोलापूर जिल्ह्यात आरटीई अंतर्गत २८६ शाळा पात्र ठरल्या असून, त्यामध्ये एकूण २ हजार ६७३ विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जाणार आहे. उर्वरित विद्यार्थ्यांनी मुदतीपूर्वी संबंधित शाळांमध्ये जाऊन आवश्यक कागदपत्रांसह प्रवेश निश्चित करावा, असे आवाहन शिक्षण विभागाने केले आहे.

प्राथमिक शिक्षण विभागाने पालकांना ही संधी वाया जाऊ न देण्याचे आवाहन केले असून, आरटीई योजनेमुळे गुणवत्तापूर्ण शिक्षणाची संधी विद्यार्थ्यांना उपलब्ध होत असल्याचे सांगितले आहे.

> आरटीई प्रवेशासाठी मुदतवाढ देण्यात आली असून, पात्र विद्यार्थ्यांच्या पालकांनी तत्काळ प्रवेश प्रक्रिया पूर्ण करावी. असे प्राथमिक शिक्षणाधिकारी कादर शेख यांनी सांगितले.

**तालुकानिहाय रिक्त जागा**

| | |
|---|---|
| अक्कलकोट | १६ |
| बार्शी | ५२ |
| करमाळा | ४५ |
| माळशिरस | ८८ |
| मंगळवेढा | २५ |
| मोहोळ | ७० |
| माढा | ९६ |
| पंढरपूर | १९६ |
| सांगोला | १०३ |
| उत्तर सोलापूर | १५८ |
| दक्षिण सोलापूर | २८ |
| सोलापूर शहर | ८८ |



## आजोबा गणपती ट्रस्टतर्फे १०० निराधार वंचितांना रस, पुरणपोळी जेवण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ एप्रिल-**

अखंड भारतातील पहिले सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ मानाचा श्री आजोबा गणपती ट्रस्टचे अध्यक्ष आमदार विजयकुमार देशमुख व अमित काबणे यांच्या वतीने यांना अक्षय तृतीयाच्या व बसवेश्वर जयंतीनिमित्त निमित्ताने आजोबा गणपतीला आंब्याची आरास केली होती.

हे आंबे आस्था सामाजिक संस्थेला पाच डझन आंबे देण्यात आले होते. तसेच आस्था सामाजिक संस्थेच्या वतीने १०० वंचित, बेघर निराधार यांना पुरणपोळी रस तुप, कटलेट, जिराराईस, वटांना भाजी या मिष्टांनाचे भोजन दिले.

याप्रसंगी आस्था सामाजिक संस्थेचे अध्यक्ष आनंद तालिकोटी, सुहास छंचुरे अमित काबणे, विनय काबणे, आलिशा काबणे, वैष्णवी काबणे, अथर्व काबणे, विराट काबणे, वरद काबणे, पिंटू कस्तुरे, सुरज छंचुरे आदी पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# विद्यार्थ्यांना आजपासून उन्हाळी सुट्टी; शिक्षकांना २ मेपासून विश्रांतीची प्रतिक्षा

**ज्या शिक्षकांना शासकीय कामांमुळे उन्हाळी सुट्टी मिळणार नाही, त्यांना पुढील काळात विशेष रजा**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ एप्रिल-**

जिल्ह्यातील इयत्ता पहिली ते नववीपर्यंतच्या विद्यार्थ्यांची अंतिम सत्र परीक्षा आज बुधवारी संपली असून त्यानंतर विद्यार्थ्यांना आजपासून उन्हाळी सुट्टीचा आनंद मिळणार आहे. परीक्षेनंतर शाळांमध्ये विद्यार्थ्यांची उपस्थिती नसल्याने सुट्टीचे वातावरण निर्माण आहे.

दरम्यान, शिक्षकांना निकाल प्रक्रियेनंतर २ मे पासून उन्हाळी सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (एससीईआरटी) यांच्या निर्देशानुसार यंदाही अंतिम सत्र परीक्षा ११ एप्रिलपासून सुरू करण्यात आली होती. आज बुधवारी शेवटचा पेपर घेण्यात आला असून त्यानंतर विद्यार्थ्यांची परीक्षा संपुष्टात येईल. वाढत्या उष्णतेच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांना दिलासा मिळणार आहे.




दरवर्षी मार्च महिन्यात परीक्षा घेण्याची पद्धत असल्याने विद्यार्थ्यांचे अध्यापन दिवस कमी होत असल्याची बाब समोर आली होती. शैक्षणिक वर्षात किमान २२० दिवस अध्यापन होणे अपेक्षित असताना अनेक शाळांमध्ये २०० दिवसही अध्यापन होत नसल्याचे निदर्शनास आले होते. यामुळे एससीईआरटीने २०२४-२५ पासून अंतिम सत्र परीक्षा एप्रिलमध्ये घेण्याचा निर्णय कायम ठेवला आहे. आता शिक्षकांसमोर आठ दिवसांत निकाल तयार करण्याचे आव्हान असणार आहे. १ मे रोजी निकाल जाहीर करण्यात येणार असून त्यानंतर २ मेपासून १४ जूनपर्यंत शिक्षकांना उन्हाळी सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. मात्र, यंदा जनगणना कामकाज तसेच नव्या अभ्यासक्रमाच्या प्रशिक्षणामुळे अनेक शिक्षकांना पूर्ण सुट्टीचा लाभ मिळण्याची शक्यता कमी आहे. ज्या शिक्षकांना शासकीय कामांमुळे उन्हाळी सुट्टी मिळणार नाही, त्यांना पुढील काळात विशेष रजा दिली जाईल, अशी माहिती प्राथमिक शिक्षणाधिकारी कादर शेख यांनी दिली.

त्यामुळे विद्यार्थ्यांसाठी सुट्टीचा आनंद सुरू झाला असला, तरी शिक्षकांसाठी कामकाजाचा ताण कायम राहणार असल्याचे चित्र दिसत आहे.

## ‘त्या’ मंडळ कृषी अधिकाऱ्याला वरिष्ठांचे अभय?

**तभा वृत्तसेवा,**
**दक्षिण सोलापूर, दि. २२ एप्रिल-**

मंद्रूप येथील मंडळ कृषी अधिकारी किरण सावंत तीन महिन्यापासून कार्यालयाला दांडी मारत प्रवासभत्ता घेतल्याचे सांगण्यात येते. त्यामुळे शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेताना शेतकऱ्यांना अडचणी येत आहेत. याबाबत वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे तक्रार केल्यानंतरही दुर्लक्ष होत असल्यामुळे वरिष्ठ अधिकाऱ्यांचे कार्यालयाला दांडी मारणार्या मंडळ अधिकार्याला अभय असल्याची चर्चा सुरू आहे. मंडळ कृषी अधिकार्यावर कारवाई करण्याऐवजी दुर्लक्ष होत असल्यामुळे शेतकरी वर्गातून संताप व्यक्त करण्यात येत आहे.

मंद्रूपचे मंडळ कृषी अधिकारी किरण सावंत हे जानेवारी महिन्यापासून मंद्रूपच्या कृषी कार्यालयाकडे फिरकलेच नाहीत. मार्च अखेरपर्यंत विविध योजनांची अनुदान प्रक्रिया पूर्ण करणे आवश्यक आहे. कृषी सहायकांमार्फत शेतकर्यांपर्यंत विविध योजनांची माहीती पोहोचवून त्यांचा लाभ मिळवून देणे आवश्यक असताना अतिरिक्त पदभाराच्या नावाखाली सावंत मंद्रूपच्या कार्यालयाला दांडी मारले आहेत. त्यामुळे मार्च महिन्यात प्रलंबित कामे पूर्ण करण्यासाठी मंडळ कृषी अधिकारी उपस्थित असणे बंधनकारक असताना शासकीय कामकाज असल्याचे सांगत सावंत कार्यालयाकडे न आल्याने तीन महिने मंडळ कृषी कार्यालय बंद होते. मंडळ कृषी अधिकाऱ्या विरोधात जिल्हा कृषी अधीक्षकांकडे तक्रार केल्यानंतर कारवाई न होता बघ्याची भूमिका असल्याने वरिष्ठ अधिकार्यांविषयी संताप व्यक्त करण्यात येत आहे. यापूर्वीही मंडळ अधिकारी व कृषी सहायकांमधील वादाचे प्रकरण कृषी अधीक्षकांकडे कारवाईविना प्रलंबित असल्याचे सांगण्यात येते. शिवाय या मंडळ अधिकार्याचे अधिकारी व कर्मचार्यांशी नेहमी वाद होत असल्याने शेतकर्यांच्या योजनांवर परीणाम होत आहे.

त्यामुळे कार्यालयाला दांडी मारणाऱ्या मंडळ कृषी अधिकाऱ्याला वरिष्ठांचे अभय असल्याची चर्चा सुरू असल्याने मंद्रूप परिसरातील शेतकऱ्यांना कृषी अवजारे, बी बियाणे, फळबाग योजना यासह इतर योजनांचा लाभ घेताना समस्या उद्भवत आहेत. मात्र वरिष्ठ अधिकारीच त्याकडे दुर्लक्ष करीत असल्यामुळे शेतकरी वर्गातून संताप व्यक्त करण्यात येत आहे. कार्यालयाला दांडी मारणाऱ्या मंडळ अधिकार्यावर कारवाई न केल्यास १ मे महाराष्ट्र दिनी आंदोलनाचा इशारा शेतकर्यांनी दिला आहे.

## शेतामधील ७७० फुट केबल चोरीस

**सोलापूर :** अज्ञात चोरट्याने तीन दिवसाच्या दरम्यान तीन शेतकऱ्यांच्या शेतामधून २६ हजार रुपये किमतीची ७७० फुट तीन पदरी केबल वायर चोरून नेल्याची घटना डोणगाव येथे २० एप्रिल रोजी उघडकीस आली. दरम्यान या प्रकरणी सलगरवस्ती पोलीस ठाण्यात आज्ञातावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत कोंडी बाबाळु जगदाळे यांनी फिर्याद दिली आहे. डोणगाव शिवारात दि. १८ ते २० एप्रिल दरम्यान यातील फिर्यादी कोंडीबा जगदाळे तसेच विनोद चौगुले व महेश मेटे यांचे शेतातील २६ हजार रुपयांची ७७० फुट पॉलीकॅब तीन पदरी केबल वायर अज्ञात चोरट्याने चोरून नेण्याचे फिर्यादीत म्हटले आहे.

## रेणुका महागांवकर यांच्या हृदयस्थ काव्य संग्रहाचे २५ एप्रिलला प्रकाशन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ एप्रिल-**

महाराष्ट्र साहित्य परिषद शाखा दक्षिण सोलापूरच्या अध्यक्षा तथा कवयित्री रेणुका अविनाश महागांवकर यांच्या हृदयस्थ या काव्य संग्रहाचे प्रकाशन ज्येष्ठ कवी अशोक नायगांवकर यांच्या हस्ते आणि गायिका सन्मिता धापटे - शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत शनिवार दि. २५ एप्रिल रोजी सायंकाळी ६. २५ वाजता लोकमान्य टिळक सभागृह चार हुतात्मा पुतळा चौक सोलापूर (ॲम्फी थिएटर) येथे होणार असल्याची माहिती कार्याध्यक्ष प्रशांत बडवे यांनी दिली.

कवयित्री रेणुका महागांवकर यांचे तिसरे पुस्तक प्रकाशित होत असताना यापुर्वी सन २०१६ मध्ये तुमच्यासाठी आणि सुजाण पालकत्व अशी दोन पुस्तके प्रकाशित झाली होती. यानंतर दि. २५ एप्रिल रोजी हृदयस्थ हे तिसरे पुस्तक प्रकाशित होणार आहे. नीता नितीन हिरवे यांच्या संवेदना प्रकाशन संस्थेकडून प्रकाशनाची जबाबदारी घेण्यात आली आहे. या हृदयस्थ या काव्य संग्रहामध्ये हृदयाला थेट भिडतील अशा कवितांचा समावेश आहे. कवी अशोक नायगांवकर यांची प्रस्तावना लाभली आहे. उ महाराष्ट्र साहित्य परिषद शाखा दक्षिण सोलापूरच्या माध्यमातून या हृदयस्थ काव्य संग्रहाचे प्रकाशन शनिवार दि. २५ एप्रिल रोजी सायंकाळी ६.२५ वाजता लोकमान्य टिळक सभागृह चार हुतात्मा पुतळा चौक सोलापूर येथे होणार आहे. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी उपाध्यक्ष प्रा.दीपक देशपांडे, कार्यवाह जितेश कुलकर्णी,कोषाध्यक्ष अमोल धाबळे,कार्यकारणी सदस्य प्रकाश मोकाशे, पृथा हलसगीकर, मेधा कुलकर्णी, अविनाश महागांवकर, प्रसिध्दी प्रमुख विनायक होटकर आदी कार्यरत आहेत.

## हुंड्यासाठी विवाहितेचा छळ; ४ लाखांच्या मागणीसाठी अत्याचार

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २२ एप्रिल-**

हुंड्यासाठी विवाहित महिलेला मानसिक व शारीरिक छळ केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी पतीसह सासरच्या पाचजणांविरुद्ध बार्शी शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सौ. रोहिणी राहुल भोसले (वय २३, सध्या रा. सिद्धार्थनगर, बार्शी) यांनी पोलिसांत दिलेल्या फिर्यादीनुसार, त्यांचा विवाह २५ जून २०२३ रोजी राहुल परशुराम भोसले (रा. साईनगर, रुई, ता. बारामती, जि. पुणे) यांच्यासोबत बौद्ध पद्धतीने बार्शी येथे झाला होता. लग्नावेळी त्यांच्या आईकडून मोठ्या प्रमाणात खर्च, संसारोपयोगी साहित्य व सोने देण्यात आले होते. लग्नानंतर सुरुवातीचे काही महिने संसार व्यवस्थित सुरु होता. मात्र त्यानंतर पती राहुल यांचे वर्तन बदलले. त्यांना दारुचे व्यसन असून, मुलबाळ होत नाही या कारणावरुन ते पत्नीला सतत अपमानास्पद वागणूक देत होते. सासू पुष्पा भोसले, सासरे परशुराम भोसले, नणंद प्रियंका मोरे व मामा विलास दनाणे हेही वारंवार तू वांझोटी आहेस, तुला घरकाम येत नाही अशा शब्दांत मानसिक छळ करत होते.

तक्रारदार महिलेने वैद्यकीय तपासणी करुन घेतली असता तिचे सर्व अहवाल सामान्य असल्याचे डॉक्टरांनी स्पष्ट केले. तरीही पतीने स्वतःची तपासणी करण्यास नकार देत शिवीगाळ केली. तसेच, तुझ्याकडून मला मूल नको, मी दुसरीकडून मूल आणीन अशा धमक्या दिल्या. दरम्यान ११ नोव्हेंबर २०२५ रोजी पती व सासरच्यांनी चारचाकी वाहन खरेदीसाठी माहेराहून ४ लाख रुपये आणण्याची मागणी केली. पैसे न आणल्यास घरात येऊ देणार नाही, असे सांगत महिलेला घराबाहेर काढण्यात आले. त्यानंतर तिचा संपर्क तोडण्यात आला. नंतर नातेवाईकांच्या मध्यस्थीने तडजोड झाली असली तरी काही दिवसांतच पुन्हा छळ सुरु झाला. पतीने तुझा माझ्याशी काही संबंध नाही, फक्त घरकामासाठी लग्न केले असे म्हणत मानसिक त्रास दिला. सासरच्यांनीही त्याला पाठिंबा देत महिलेला अपमानास्पद वागणूक दिली.

फेब्रुवारी २०२६ मध्ये नातेवाईकांच्या लग्नानिमित्त माहेरी आलेल्या महिलेला पुन्हा सासरी घेण्यास नकार देण्यात आला. तुला घटस्फोट देणार, असे सांगत घराचे दरवाजे बंद करुन सासरच्यांनी तिला हाकलून दिले. तेव्हापासून ती बार्शी येथे आईकडे राहत आहे.

तक्रारीनुसार, जानेवारी २०२४ ते फेब्रुवारी २०२६ या कालावधीत पती राहुल भोसले, सासू पुष्पा भोसले, सासरे परशुराम भोसले, नणंद प्रियंका मोरे व मामा विलास दनाणे यांनी हुंड्यासाठी वारंवार मागणी करुन शारीरिक व मानसिक छळ केला. तसेच दुसरे लग्न लावून देण्याची धमकीही दिली. याप्रकरणी संबंधितांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलिसांकडून पुढील तपास सुरु आहे.

## बुंध्यापर्यंत काँक्रीट ओतून झाडांची ‘मूकहत्या’

**● कंत्राटदारांवर गुन्हे दाखल करण्याची सुराज्य अभियानने केली मागणी ●**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ एप्रिल-**

रस्ते विकास आणि सौंदर्यीकरणाच्या नावाखाली नॅशनल ग्रीन ट्रिब्युनल (एनजीटी) च्या आदेशांकडे दुर्लक्ष करून झाडांच्या बुंध्यापर्यंत काँक्रीट ओतून ही ‘मूक हत्या’ सुरू असल्याचा आरोप करत या प्रकरणी संबंधित कंत्राटदार जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करावी अन्यथा फौजदारी तक्रार नॅशनल ग्रीन ट्रिब्युनल कडे अवमान याचिका दाखल करण्यात येईल, असा इशारा सुराज्य अभियानचे समन्वयक दत्तात्रय पिसे यांनी दिला आहे.

महानगरपालिका तसेच पोलीस आयुक्तालयासमोरील रस्त्यांवरही झाडांभोवती काँक्रीट टाकल्याचे उदाहरण देत, शासकीय कार्यालयांसमोरच असे प्रकार उघडकीस आले आहेत. अशा पद्धतीने झाडांचा गळा दाबला जात असेल, तर ही झाडे वाचवणार कोण? असा सवाल त्यांनी उपस्थित केला. एनजीटीने २१ मे २०२५ रोजी दिलेल्या पॅन इंडिया आदेशानुसार, नागरी भागातील झाडांभोवती किमान १ मीटर जागा काँक्रीटमुक्त ठेवणे बंधनकारक आहे. मात्र सोलापुरात या नियमांचे सरळ उल्लंघन होत आहे.यामुळे भूगर्भातील जलपुनर्भरण प्रक्रिया बाधित होत असून शहरातील तापमान वाढीस प्रशासनच जबाबदार असल्याचा आरोपही त्यांनी केला आहे.



महाराष्ट्र झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम १९७५ नुसार झाडांवर खिळे ठोकणे, जाहिराती लावणे किंवा त्यांना इजा पोहोचवणे हा दंडनीय गुन्हा असताना, संबंधित कंत्राटदारांवर कोणतीही कारवाई होत नसल्याबद्दलही संताप व्यक्त करण्यात आला. झाडांभोवतीचे काँक्रीट काढून त्यांना ‘श्वास’ मोकळा करून देण्यासह दोषी कंत्राटदार आणि अधिकाऱ्यांवर फौजदारी गुन्हे दाखल करावेत, अशी मागणी यावेळी करण्यात आली. दिल्लीप्रमाणे झाडांच्या संरक्षणासाठी कार्यप्रणाली करण्याची मागणी सुराज्यने केली. दरम्यान, प्रशासनाने ठोस कारवाई न केल्यास एनजीटी क्ट २०१० अंतर्गत फौजदारी तक्रार दाखल करण्याबरोबरच एनजीटीकडे अवमान याचिका दाखल करण्याचा इशाराही दत्तात्रय पिसे यांनी दिला आहे. या पत्रकार परिषदेस राजन बुणगे, सतीश गाजुल, जयंत होले - पाटील आदी उपस्थित होते.

## ‘कारकल’चे ग्रामदैवत श्री मल्लिकार्जुन यात्रेनिमित्त विविध कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**दक्षिण सोलापूर, दि. २२ एप्रिल-**

दक्षिण सोलापूर तालुक्यातील कारकल येथील ग्रामदैवत श्री मल्लिकार्जुन यात्रा सालाबादप्रमाणे यंदाही बुधवार दिनांक २२ एप्रिल पासुन सुरु झाले असून पहाटे सहा वाजल्यापासून ते सकाळी आठ वाजेपर्यंत कपीलसिद्ध श्री मल्लिकार्जुन व विरभद्रेश्वर श्री भ्रमरांबिका देवी व श्री धानम्मा देवींच्या दिव्य मुर्तीची महारूद्राभिषेक संपन्न झाले.

माळकवठेचे मठाधिपती षटस्थल ब्रम्ही श्री डॉ. गुरू पंचाक्षरी शिवाचार्य महास्वामीजी यांची अड्डपालखी व १०१ सुहासिनी जलकुंभासह मिरवणूक सोहळा पार पडला. त्यानंतर सकाळी अकरा वाजल्यापासून श्री उमामहेश्वर हरदेशी यांचे अथणी जिल्हा बेळगाव आणि महालक्ष्मी नागेशी बबलेश्वर जिल्हा विजापूर यांची कलगी तुर्याचे गाण्याचा कार्यक्रम पार पडले. त्याचदिवशी संध्याकाळी ठिक सहा वाजता जंगम महास्वामीजी यांना महाप्रसाद व रात्री ठिक अकरा वाजता सदर बाशिंग मिरवणूकीने देवालयात उराग्री महापुजा समारंभ संपन्न झाले. त्यानंतर पुन्हा कलगी तुर्याचे गाणे पार पडले. त्याचप्रमाणे गुरुवार दिनांक २३ एप्रिल रोजी सकाळी ठिक नऊ वाजता नंदीध्वजासह श्री मल्लिकार्जुन श्री विरभद्रेश्वर पालखीसह मालदार पुरवंताचे मिरवणूक सोहळा संपन्न होणार आहे. दुपारी ठिक ४ वाजता कुस्ती स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

यावेळी दुपारी ४ वाजता होणाऱ्या कुस्ती स्पर्धेसाठी दुपारी २ ते ३ या कालावधीत नावनोंदणी करण्यात येणार आहे त्यानंतर येणाऱ्या पैलवानांची नावे घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी अशी यात्रा पंचकमिटीच्या कळवण्यात आले आहे. त्याचप्रमाणे गुरुवार दिनांक २३ एप्रिल रोजी रात्री ठिक १० वाजता श्री अमाजेश्वरी नाट्य संघ काकमरी तालुका अथणी जिल्हा बेळगाव यांचे सुंदर कौटुंबिक, सामाजिक कन्नड नाटक जगज्योती बसवेश्वर अर्थात कल्याण क्रांती सुंदर कन्नड नाटक होणार आहे.

## ‘गावकऱ्यांनी केलेला सत्कार लाखमोलाचा असतो’

**सेवानिवृत्त गुरुजन, पदोन्नती मिळवलेले गुरुजन व भरतीमधील तरुणी सत्काराने भारावल्या**

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. २२ एप्रिल-**

माणुस आयुष्यात पुढे गेल्यानंतर प्रत्येक ठिकाणी मान सन्मान मिळतात. सत्कार केले जातात. परंतु आपल्या जन्मभुमीत म्हणजेच आपल्याच गावातील ग्रामपंचायत किंवा नागरिकांनी केलेल्या सत्काराची किंमत लाखमोलाची असते, अशी भावना सत्कारमुर्तीनी व्यक्त केली.



चपळगांव-बावकरवाडी ग्रामपंचायत परिवार व ग्रामस्थांकडून गावातील सेवानिवृत्त गुरुजन, पदोन्नती मिळवलेले गुरुजन व कष्ट व जिद्दीच्या बळावर पोलिस दलात भरती मिळवलेल्या तरुणींचा सन्मान करण्यात आला. यामध्ये सेवानिवृत्त मुख्याध्यापक सुभाष बिराजदार गुरुजी, काशिनाथ बंडगर गुरुजी, नूतन मुख्याध्यापक विश्वनाथ बाणेगांव, नूतन पर्यवेक्षक ज्ञानेश्वर कदम यांचा सपत्नीक सत्कार करण्यात आला. तर महाराष्ट्र पोलीस दलात भरती झालेल्या गावच्या संघर्षकन्या साक्षी सुरेश कल्याणशेट्टी व शिवानी सुरेश मनगुळे यांचा विशेष सत्कार करण्यात आला. अध्यक्षस्थानी प्रशासक सरपंच वर्षा भंडारकवठे होत्या. तर व्यासपीठावर तंटामुक्त अध्यक्ष संजय बाणेगांव, पोलिस पाटील विवेकानंद हिरेमठ, पोलिस पाटील दयानंद बावकर, सामाजिक कार्यकर्ते सिध्दाराम भंडारकवठे, परमेश्वर वाले, गणेश कोळी, तंटामुक्त उपाध्यक्ष विशालराज नन्ना, सोसायटीचे व्हा. चेअरमन सुरेश सुरवसे, गंगाधर कांबळे गुरुजी, महादेव मोची, सुभाष बुगडे, प्रकाश बुगडे, विजयकुमार कोरे, श्रीशैल गाडवे, मोनप्पा दुलंगे, मडोळप्पा बाणेगांव, अंबण्णा हाल्लोळे, शरणप्पा हन्नुरे, दाऊद पटेल, लिपीक उमेश सोनार उपस्थित होते. सूत्रसंचालन शंभुलिंग अकतनाळ यांनी तर आभार सिध्दाराम भंडारकवठे यांनी मानले.

## महत्वाचे...



### वसुंधरा दिनानिमित्त पाच दिवसीय मधमाशी पालन प्रशिक्षण

**सोलापूर, दि. २२ एप्रिल-**

जागतिक वसुंधरा दिनाचे औचित्य साधून युगंधर फाउंडेशन, सोलापूर यांच्या वतीने शहरात पाच दिवसीय मधमाशी पालन प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले आहे. एप्रिल महिन्यात वाढत्या उष्णतेमुळे मधमाशांचे मोठ्या प्रमाणात स्थलांतर होते. याच काळात नागरी वस्त्यांमध्ये आग्या मोहोळ हल्लयांच्या घटनाही वाढताना दिसतात. तसेच मधमाशी पालन हा शेतीपूरक आणि उत्पन्नवाढीसाठी उपयुक्त व्यवसाय ठरावा, यासाठी या प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले आहे. प्रशिक्षणामध्ये उद्योग उभारणीसाठी आवश्यक शासकीय योजना आणि त्यांचा लाभ घेण्यासाठी आवश्यक मार्गदर्शनही दिले जाणार आहे. मधमाशी नाहीशी झाली तर पृथ्वीवरील जीवसृष्टी धोक्यात येईल, असे प्रतिपादन थोर शास्त्रज्ञ आईन्स्टाईन यांनी केले असल्याचा उल्लेख करत, मधमाशी संवर्धनाचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले आहे. हे प्रशिक्षण २६ एप्रिल ते ३० एप्रिल २०२६ या कालावधीत दररोज सकाळी ८ ते १२ या वेळेत युगंधर फाउंडेशन संचालित आम्ही निसर्ग यात्री पर्यावरण केंद्र, डोणगाव रोड, सोलापूर येथे पार पडणार आहे. प्रशिक्षण पूर्ण करणाऱ्या सहभागींस पुणे येथील केंद्रीय मधमाशी पालन प्रशिक्षण व संशोधन संस्थेमार्फत प्रमाणपत्र प्रदान करण्यात येणार असून, हे प्रमाणपत्र भविष्यात मधमाशी पालन व्यवसाय आणि शासकीय योजनांचा लाभ घेण्यासाठी उपयुक्त ठरणार आहे, अशी माहिती संस्थेच्या अध्यक्षा प्रा. रेश्मा माने यांनी दिली.



### महात्मा बसवेश्वरांचे तत्त्वज्ञान विचार करायला भाग पाडते : प्रा. पठाण

**सोलापूर, दि. २२ एप्रिल-**

महात्मा बसवेश्वर यांनी बाराव्या शतकात जात-पात अंधश्रद्धा आणि कर्मकांडाच्या जातीय व्यवस्थेत सापडलेल्या समाजाला समता. स्वातंत्र्य आणि बंधुता या मूल्यावर आधारित एक नवा समाज व्यवस्थेचा आराखडा मांडला. बसवेश्वरांचे तत्त्वज्ञान आजही नवे दिशेने विचार करायला भाग पाडते, असे मत सोलापूरचे माजी उपमहापौर तसेच माझी प्राचार्य नसीमा पठाण यांनी महात्मा बसवेश्वरांच्या जयंतीनिमित्त गुरु विद्या प्रतिष्ठान यांनी सोलापूर येथील समृद्धी हॉटेल येथे आयोजित केलेल्या पुरस्कार वितरण समारंभात बोलताना केले. प्रास्ताविक राजश्री तडकासे यांनी केले. यावेळी व्यासपीठावर कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे सोशल कॉलेजचे माजी प्राचार्य के. एम. जमादार व संस्थापक अध्यक्ष सोमशेखर भोगडे, गुरु विद्या प्रतिष्ठानचे अध्यक्ष सातलिंग शटगार, नमिता थिटे, श्रीदेवी यलमेली, विजयकुमार भोगडे आदी उपस्थित होते. यावेळी वसुंधरा शर्मा, संदीप भंडारे, दत्तात्रय खडतरे, स्वामीनाथ कलशेट्टी यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी बार्शीचे विजय साळुंखे व स्वामीनाथ कलशेट्टी यांना बसव रत्न, संदीप भंडारे व सौ भंडारे यांना बसवंत दांपत्य व वसुंधरा कुलकर्णी यांना बसव शरणी, दत्तात्रय खडतरे व कविता खडतरे यांना बसवश्री, क्षितिजा गाताडे यांना बसवभूषण सुवर्णा धरणे व नगमा मोहसीन शेख यांना बसव शरणी, निर्मला श्रीमंत दुधनी बसव माता पुरस्कार व शितल चंद्रशेखर वाघमोडे यांना बसव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. सूत्रसंचालन श्रीदेवी यळमेली यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी नेहा भोगडे, शिवलिंग भोगडे, उत्तम वाघमारे, करण गहिलवार यांनी परिश्रम घेतले.



### सीबीएसई दहावीच्या परीक्षेत ऑर्किडची आरुषी उस्तुरगे सोलापुरात अव्वल

**सोलापूर, दि. २२ एप्रिल-**

सीबीएसई माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेचा ऑनलाईन निकाल जाहीर झाला असून सोलापूर शहरातील सीबीएसई पॅटर्नमध्ये नावलौकिक प्राप्त नागेश करजगी ऑर्किड स्कूलने विद्यार्थ्यांच्या उज्वल यशाने आपली गुणवत्ता सिद्ध केली आहे. गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान सोहळा स्कुलमध्ये आयोजित करण्यात आला होता. सोलापूर महापालिकेच्या स्थायी समिती सभापती रंजिता चाकोते यांच्या हस्ते विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष डॉ. कुमार करजगी, सचिवा वर्षा विभुते, विश्वस्त सोमनाथ करजगी, योगिनाथ करजगी, मोहिनी करजगी, व्यवस्थापक अक्षय चिडगुंपी, प्राचार्या रुपाली हजारे, शाळेच्या मार्गदर्शिका मीना पारखे उपस्थित होते. स्कूलची विद्यार्थिनी आरुषी उस्तुरगे हिने ९९.६० टक्के गुण मिळवून सोलापुरात प्रथम येण्याचा बहुमान मिळविला आहे तसेच यशराज भोसले याने सुद्धा ९९ टक्के गुण मिळवून सोलापुरात द्वितीय स्थान मिळविले. १२७ विद्यार्थ्यांनी प्रथमश्रेणीत उत्तीर्ण होवून शाळेच्या उज्वल यशाची परंपरा कायम ठेवली आहे. मराठी विषयात २५ विद्यार्थ्यांनी १०० पैकी १०० गुण मिळविले आहेत. विद्यार्थ्यांच्या यशासाठी प्राचार्या रुपाली हजारे, शिक्षकवृंद तुलसाश्री चितारी, हीना पटेल, स्वाती कोकाटे, श्रीकांत जोशी, राजेश्वरी शिरकणहळळी, इमरान सय्यद, लता भोसले, अमित वाले भाग्यश्री नंदी, ममता बालिंगल, आदिनाथ सरवदे, राजश्री महाले, आनंद लिगाडे, चंदन माने, कविता श्रीगादी, सारिका मुळे तसेच पालकांनी परिश्रम घेतले. प्राचार्या रुपाली हजारे यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. सूत्रसंचालन तुलसाश्री चितारी यांनी केले.

CMYK

# आपला जिल्हा

**सोलापूर तरुण भारत**, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## उष्णतेच्या लाटेपासून स्वतःचे संरक्षण करा : डॉ. सोनलकर

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. २२ एप्रिल-**



सांगोला शहरासह तालुक्यात गेली दोन दिवस वातावरणात बदल झाला होता परंतु आता परत कडक ऊन पडत आहे. याबाबत सध्या कडक ऊन आणि उष्णतेच्या लाटेपासून स्वतःचे संरक्षण करण्यासाठी नागरिकांनी जास्तीत जास्त पाणी किंवा पातळ पदार्थ प्या, सुती कपडे वापरा, आणि सकाळी १० ते दुपारी ४ या वेळेत बाहेर पडणे टाळा असे आवाहन सांगोला शहरातील अमृतयोग हॉस्पिटलचे डॉ.अभिजित सोनलकर यांनी केले.

उष्माघात टाळण्यासाठी डोके झाकून ठेवा, कैरीचे पन्हे, ताक, लिंबू पाणी यांसारख्या थंड पेयांचा आहारात समावेश करा. तहान लागली नसली तरीही, दर अर्ध्या तासाच्या फरकाने पाणी प्या. शरीरातील पाण्याची पातळी टिकवून ठेवा. दुपारी बाहेर पडणे टाळा: सकाळी १० ते दुपारी ४ या वेळेत कडक ऊन असते. या काळात घराबाहेर जाणे टाळा. सैलसर, हलक्या रंगाचे आणि सुती कपडे वापरा. बाहेर पडताना छत्री, टोपी, स्कार्फ, रुमालाचा वापर करून डोके आणि मान झाकून ठेवा. पचायला हलका आणि ताज्या अन्नाचे सेवन करा. चक्कर आल्यासारखे वाटल्यास किंवा उष्णतेचा त्रास झाल्यास तात्काळ सावलीत किंवा थंड ठिकाणी बसा. याप्रमाणे आरोग्याची काळजी घ्या आणि स्वतःला सुरक्षित ठेवा असे आवाहन सोनलकर यांनी केले.



### महत्त्वाचे...



## पंढरीत परशुराम जन्मोत्सव साजरा

**पंढरपूर, दि. २२ एप्रिल-**

मध्यवर्ती ब्राह्मण संघ व श्री परशुराम सर्पमित्र मंडळ यांचे वतीने श्री परशुराम जन्मोत्सव साजरा करण्यात आला. यावेळी शोभायात्रेचे देखील आयोजन करण्यात आलेले हाते. परशुराम जयंती निमित्त रविवारी (दि.१९) श्री. व सौ. नितीन कुलकर्णी या उभयतांच्या हस्ते श्रींच्या मुर्तीस अभिषेक व पूजा करण्यात आली. दरम्यान सोमवारी (दि.२०) पंढरपूर मंगळवेढा मतदार संघाचे आमदार समाधान आवताडे व माजी आमदार प्रशांत परिचारक यांचे हस्ते परशुरामाच्या मुर्तीचे पूजन करण्यात आले. त्या नंतर शोभायात्रेस प्रारंभ करण्यात आला. यावेळी युवानेते प्रणव परिचारक, नगरसेवक ओंकार जोशी, नगरसेवक, भागवत महाजन, नगरसेवक सौरभ थिटे, नगरसेविका मनिषा देशपांडे, डॉ. सुरेंद्र काणे, श्रीकांत महाराज हरिदास, द.ह.कवठेकर प्रशालेचे मुख्याध्यापक व्ही. एम. कुलकर्णी उपस्थित होते. प्रदक्षिणा मार्गावरून श्री भगवान परशुराम यांच्या मुर्तीची शोभायात्रा काढण्यात आली. शाभा यात्रेच्या मार्गावर विविध समाज बांधव व भगिनींनी आपापल्या दुकानांसमोर व घरापुढे सडा रांगोळीने शेभा यात्रेचे स्वागत केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी ओंकार वाटाणे, वैभव कुंभारे, गणेश कुलकर्णी, नितीन कुलकर्णी, मंदार जोशी, आनंद तेंडुलकर, उमेश टोमके-भागवत, गणेश लंके, श्रीराम बडवे, अमित शिरगावकर, महेश आराध्ये, श्रीराम बेणारे, महेश काळे यांनी परिश्रम घेतले.



## ॲड. शितल गुंड यांना शिवसेना (शिंदे गट) युवती सेवा शहराध्यक्ष पदाचे प्रमाणपत्र प्रदान

**बार्शी, दि. २२ एप्रिल-**

बार्शी शहरातील ॲड. शितल गुंड यांची शिवसेना (शिंदे गट) युवती सेवा बार्शी शहराध्यक्ष या पदी नेमणूक करण्यात आलेली होती. दि. १८ एप्रिल रोजी मुंबई येथे शिवसेना शिंदे गटकडून आयोजित 'महायुवोत्सव' कार्यक्रमात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व खासदार डॉ श्रीकांत शिंदे यांचे प्रमुख उपस्थितीत पुर्वेश सरनाईक व किरण साळी यांचे सुचनेनुसार प्रियांका परांडे, युवती सेवा राज्य कार्यकारणी सदस्य, पश्चिम महाराष्ट्र यांचे हस्ते प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. महायुवोत्सव कार्यक्रमाची सुरुवात दिपप्रज्वलनाव्दारे व छत्रपती शिवाजी महाराज यांचे प्रतिमेचे पूजन करुन करण्यात आली.महायुवोत्सव कार्यक्रमात दिपप्रज्वलनाचा मान वरिष्ठ पदाधिकारी यांच्याकडून ॲड. शितल गुंड यांना देण्यात आला.



## साधूसंतांनी परंपरेचे सातत्य टिकविण्यासाठी मंगलाचरण केले : ऋषिकेश महाराज देहूकर

**वेळापूर, दि. २२ एप्रिल-**

मळोली (ता.माळशिरस) येथील श्री संत तुकाराम महाराज यांचे आठवे वंशज श्रीगुरु वै. भागवत महाराज देहूकर यांच्या पुण्यस्मरणार्थ अखंड हरिनाम सप्ताह प्रारंभ झाला असून पहिल्या दिवसाची कीर्तन सेवा श्री संत तुकाराम महाराजांचे अकरावे वंशज हभप प्रा. ऋषिकेश महाराज देहूकर यांची संपन्न झाली. गेली अनेक वर्षापासून श्री संत तुकाराम महाराज यांचे वंशज मळोली ता. माळशिरस या ठिकाणी वास्तव्य करीत असून मळोली व परिसरातील भाविकांनी त्यांना गुरुस्थानी मानले असून त्यांची मळोली गावात सद्य स्थितीत अकरावी पिढी कीर्तन परंपरेच्या माध्यमातून संतांचे विचार समाजात मांडत आहेत. आज पहिल्या दिवशी किर्तन सेवेत हभप प्रा. ऋषिकेश देहूकर म्हणाले की देहूकर फडावर सप्ताहच्या पहिल्या दिवशी समचरण दृष्टी विटेवरी साजिरी या अभंगावर कीर्तन करण्याची प्रघात असून या अभंगामध्ये देवाचे मंगलाचरण सांगितले आहे, शास्त्रात याचे तीन मुख्य विचार दिसून येत असून प्रथम इष्ट प्राप्ती, द्वितीय अनिष्ट निवृत्ती व तृतीय परंपरेचे सातत्य. साधू संतांनी परंपरेचे सातत्य टिकविण्यासाठी मंगलाचरण केले. संतांनी कीर्तनाच्या माध्यमातून विचारांचा जागर करून समाजास अंधःकारातून बाहेर काढले. त्यासाठी त्यांना स्वतःस अगोदर त्रास सहन करावा लागला. गावोगावी ज्ञानेश्वरी व गाथा पारायण झालेच पाहिजे असे मत हभप प्रा. देहूकर यांनी व्यक्त केले.

## वडिलांनी मुलाला केली बेल्टने मारहाण

**सोलापूर, दि. २२ एप्रिल-**

घरगुती वादात एका वडिलाने आपल्या तरुण मुलाला बेल्टने मारहाण केल्याची घटना दत्तनगर येथे आज बुधवारी दुपारी तीन वाजता घडली. अंबादास राजू वंगा (वय ३३ वर्ष , राहणार दत्तनगर सोलापूर) असे त्या मारहाण झालेल्या मुलाचे नाव असून आज बुधवारी दुपारी घरामध्ये वडिलां बरोबर वाद झाले. यावेळी वडिलांनी त्याला बेल्टने मारहाण केली. त्यात हाताला जखम झाल्याने तो उपचाराकरिता येथील शासकीय रुग्णालयात सायंकाळी स्वतः दाखल झाला.

# राष्ट्रमाता जिजामाता उद्यान लोकार्पणानंतरही बंदच

### माजी नगरसेवक शिरसटांनी बालगोपाळांना घेऊन केले आंदोलन

### पालिका प्रशासनाच्या ढिसाळ कारभाराचा व्यक्त केला निषेध

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२२ एप्रिल-**

पंढरपूर शहरातील राष्ट्रमाता जिजामाता उद्यानाचे उद्घाटन नुकतेच संपन्न झाले आहे. राष्ट्रमाता जिजामाता उद्यान लोकार्पण सोहळ्यानंतर राजकीय आरोप प्रत्यापरोप सुरू झाले आहेत. सत्ताधारी गटाने विश्वासात न घेता उद्घाटन केल्यामुळे नाराजी व्यक्त केली आहे. तर भारतीय जनता पार्टीच्या वतीने माजी शहराध्यक्ष विक्रम शिरसट यांनी राष्ट्रमाता जिजामाता उद्यान येथे लोकार्पण सोहळा होऊन देखील हे उद्यान अद्यापर्यंत सर्वसामान्य नागरिकांकरिता खुले न केल्यामुळे त्यांनी प्रशासनावर जोरदार टीका करत बालगोपाळांना सोबत घेऊन आंदोलन केले आहे.

श्री. शिरसट यांनी सांगितले की, राष्ट्रमाता जिजामाता उद्यान लोकार्पण सोहळा व उद्घाटन प्रसंगी जिल्ह्याचे माजी आमदार प्रशांत परिचारक तसेच विद्यमान आमदार समाधान अवताडे यांनी पंढरपूर शहराच्या विकासा करिता कोठेही निधी कमी पडू देणार नाही असे ठोस आश्वासन दिले आहे. जिजामाता उद्यानातील उरलेली सर्व कामे पूर्ण करू. कामाच्या बाबतीत विरोधकांनी कधीही सांगावे आम्ही सर्व कामे पूर्णत्वास नेण्याकरिता सदैव तत्पर आहोत. शहरातील विविध कामाकरिता विकास निधी आम्हालाच आणायचा आहे. याची आम्हाला जाणीव आहे असे आश्वासन माजी आमदार परिचारक यांनी दिलेले आहे. तर पायात पाय घालून राजकारण करण्यापेक्षा हातात हात घालून विकास कामे करूया. अशी विनंती देखील आमदार आवताडे यांनी केली आहे. मात्र सत्ताधारी व प्रशासन हे कुरघोडीचे राजकारण करत आहे.

राष्ट्रमाता जिजामाता उद्यानाचा लोकार्पण सोहळा मोठ्या थाटामाटात संपन्न झालेला असताना देखील जाणीवपूर्वक प्रशासनाने उद्यानाला टाळे ठोकून ठेवले आहे. पंढरपूर शहरातील शाळेतील लहान मुले, वयोवृद्ध नागरिक, महिला यांचा आनंद हिरावून घेण्याचे काम प्रशासन करत आहे.

खरं म्हणजे बालकांकरिता महिलांकरिता, वयोवृद्ध नागरिकांकरिता हे उद्यान खुले करणे गरजेचे असताना देखील काल प्रशासनाने लोकार्पण सोहळा होऊन देखील हे उद्यान बंद ठेवले होते. यामुळे शिरसट यांनी नगरपालिका प्रशासनाचा निषेध व्यक्त केला आहे आमची लढाई ही प्रशासनाच्या ढिसाळ कारभारा विरोधात आहे. प्रशासन जाणीवपूर्वक अडकाठीची भूमिका घेत आहे. तसेच जिजामाता उद्यान भविष्यात लवकरात लवकर सुरू न केल्यास जिल्हाधिकारी यांची भेट घेऊन संबंधित नगरपालिका प्रशासनातील अधिकाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई करण्यात यावी अशी मागणी देखील करणार असल्याचे शिरसट यांनी यावेळी सांगितले.

> **निकृष्ट दर्जाचे कामआढळले तर कारवाई करण्यात येईल**
>
> राष्ट्रमाता जिजामाता उद्याना संदर्भात तक्रारी आल्या आहेत. याबाबत आपण पुणे येथील शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाकडून तपासणी किंवा थर्डपार्टी ऑडिट करणार आहोत. निकृष्ट दर्जाचे काम आढळले तर कारवाई करण्यात येईल. या बरोबरच उद्याना मध्ये वॉशरूम, बॉचमन ठेवण्यात येईल.
>
> **- महेश रोकडे,**
> मुख्याधिकारी, पंढरपूर नगरपालिका





# भगवंत महोत्सवास सुरुवात

### ●राज्यस्तरीय भारूड स्पर्धेत रुपाली देशपांडे प्रथम

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २२ एप्रिल-**



श्री भगवंत महोत्सवानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय भारुड स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून, या स्पर्धेत रुपालीताई देशपांडे यांनी प्रथम क्रमांक पटकावत आपली कलाकारी सिद्ध केली. तर गणेश महाराज पाटोळे यांनी द्वितीय आणि जगन्नाथ महाराज खरात यांनी तृतीय क्रमांक मिळवला.

श्री भगवंत महोत्सवाच्या निमित्ताने बार्शीतील यशवंतराव सांस्कृतिक सभागृहात दोन दिवस चाललेल्या या स्पर्धेत राज्यभरातील सुमारे ४० संघांनी सहभाग नोंदवला होता. भारुड या पारंपरिक लोककलेच्या माध्यमातून धार्मिक, आध्यात्मिक आणि सामाजिक विषयांचे प्रभावी सादरीकरण करत स्पर्धकांनी प्रेक्षकांची मने जिंकली. स्पर्धेचे परीक्षक म्हणून प्रसिद्ध भारुडकार चंदाताई तिवाडी आणि संगीत विशारद निलेश मांजरे यांनी काम पाहिले. त्यांच्या कसून परीक्षणानंतर विजेत्यांची घोषणा करण्यात आली.

प्रथम क्रमांक मिळवलेल्या रुपालीताई देशपांडे यांना रोख ५१ हजार रुपये, सन्मानचिन्ह आणि सन्मानपत्र देण्यात आले. द्वितीय क्रमांकाच्या गणेश महाराज पाटोळे यांना ३१ हजार रुपये, तर तृतीय क्रमांकाच्या जगन्नाथ महाराज खरात यांना २१ हजार रुपये, सन्मानचिन्हं आणि सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले. तसेच उत्तेजनार्थ सरिताताई जोशी आणि संतोष महाराज भालेराव यांना प्रत्येकी ११ हजार रुपये, सन्मानचिन्ह आणि सन्मानपत्र प्रदान करण्यात आले. या स्पर्धेतील विजेत्यांना माजी आमदार तथा महोत्सवाचे संकल्पक राजेंद्र राऊत यांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले. भगवंत मैदान येथील मुख्य रंगमंचावर पार पडलेल्या या सन्मान सोहळ्यास नगराध्यक्ष, उपनगराध्यक्ष, नगरसेवक, माजी नगरसेवक तसेच महोत्सव समितीचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## तरुणाला गॅस पाईप व लाथा बुक्क्याने मारहाण

**सोलापूर, दि. २२ एप्रिल-**

मुलीला तू कट का मारला असे म्हणून एका तरुणाला गॅस पाईप व लाथा बुक्क्याने मारहाण करण्यात आल्याची घटना मोहोळ तालुक्यातील खंडाळी गावात मंगळवारी घडली. कुंदन उत्तम जगताप (वय २६ वर्ष, रा.खंडाळी) असे त्या मारहाण झालेल्या तरुणाचे नाव असून त्याला मंगळवारी खंडाळी गावातील शाळेजवळ शाळेत जाणाऱ्या मुलीला तू कट का मारला असे म्हणून मदन पाटील, काका पाटील व इतर एकाने मिळून गॅस पाईप व लाथा बुक्क्यांनी मारहाण केली. मार लागल्याने मोहोळच्या आरोग्य केंद्राचा प्रथमोपचार करून येथील शासकीय रुग्णालयात तो स्वतः पहाटे दाखल झाला.





## नातेगुंफण पुस्तकाचे प्रकाशन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ एप्रिल-**

मुळचे सोलापूरकर असलेल्या कृष्णकेशव देशमुख यांच्या नातेगुंफण या पुस्तकाचे प्रकाशन वेलवेट कविशा प्रकाशन आणि 'झेप' या सामाजिक संस्थेतर्फे एकाचवेळी पन्नास पुस्तकांच्या प्रकाशन सोहळ्यात करण्यात आले. या उपक्रमाची नोंद एशिया बुक ऑफ रेकॉर्डस आणि इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड मध्ये झाली आहे. पुण्यातील नटसम्राट निळू फुले नाट्यगृहात पार पडलेल्या या सोहळ्यात मान्यवराच्या हस्ते कृष्णकेशव देशमुख यांच्या वरील पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले.

प्रमुख पाहुणे म्हणून प्रसिद्ध समीक्षक सौमित्र पोटे, सुप्रसिद्ध लेखिका रोहिणी निनावे, गायिका मंजुश्री ओक तसेच सोलापूर आणि पुण्याच्या विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

## उद्दिष्ट पूर्ण न करणाऱ्या ४७ कर्मचाऱ्यांना दंड

**सोलापूर, दि. २२ एप्रिल-**

महापालिकेचे उत्पन्न वाढवण्याच्या दृष्टीने महापालिका प्रशासन विविध उपाययोजना करीत आहेत. त्याचाच एक भाग म्हणून मालमत्ता कर विभागाकडून नवीन मिळकतींचा शोध घेण्याची मोहीम सुरू आहे. या कामासंदर्भातील उद्दिष्ट पूर्ण न करणाऱ्या ४७ कर्मचाऱ्यांना २८ हजार ५०० रुपयांचा दंड करण्यात आला आहे.

दि.२१ एप्रिलपर्यंतचा सर्व्हेक्षण व आकारणीचा एकत्रित अहवाल पाहता दिलेल्या उद्दिष्टाप्रमाणे सर्व्हेक्षण व आकारणीची कार्यवाही झालेली नसल्याचे दिसून आले आहे. या कर्मचाऱ्यांनी दि.८ एप्रिलपासून एकाही मिळकतीची आकारणी केली नसल्याचे दिसून आलेले आहे. ही बाब अत्यंत गंभीर व कार्यालयीन शिस्तीस बाधा पोहोचविणारी असल्याने त्यांना दंड करण्यात आला आहे. महापालिका प्रशासनाने दिलेल्या उद्दिष्टानुसार नवीन मिळकतीचा शोध घेऊन आकारणीची कार्यवाही न करणे, आदेशाचे पालन न करणे या काम काजातील निष्काळजीपणाच्या गैरवर्तनासाठी संबंधित १० कर निरीक्षक व ३७ वसुली क्लार्क अशा एकूण ४७ कारणे दाखवा नोटीसही बजावण्यात आली, तथापी त्यांच्या कामकाजामध्ये कोणतीही सुधारणा झालेली नाही. यामुळे या कर्मचाऱ्यांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ५६(२) (ड) च्या तरतुदीनुसार आर्थिक दंड करण्यात येत आहे. एप्रिल पेड इन मे वेतनातून हा दंड वसूल केला जाणार आहे.


# गतवर्षी अतिवृष्टीमुळे भूगर्भातील पाणीसाठ्यात भरीव वाढ

### ०.४९ मीटरने पाणीपातळी आली वर

### जिल्ह्याचे वरिष्ठ भूवैज्ञानिक डॉ. मुश्ताक शेख यांची माहिती

**तभा वृत्तसेवा । अविनाश गायकवाड**
**सोलापूर, दि. २२ एप्रिल-**

गतवर्षी जिल्ह्यात अतिवृष्टी झाल्याने वार्षिक सरासरीच्या दीडपट पावसाची नोंद झाली होती. यामुळे पाण्याची पातळी अतिशय वर आली आहे आणि भुगर्भात मोठा पाणीसाठा झाला आहे. पावसामुळे गतवर्षी शेतकऱ्यांच्या खरीप पिकाचे मोठे नुकसान झाले असले तरी सध्या उन्हाळ्यात मात्र शेतकरी बांधव आणि इतरही नागरिकांना या पाण्याचा मोठ्या प्रमाणात फायदा होत असल्याचा निर्वाळा जिल्ह्याचे वरिष्ठ भुवैज्ञानिक डॉ. मुश्ताक शेख यांनी दैनिक तरूण भारतशी बोलताना दिला.





जिल्ह्यात तालुकानिहाय पाणीपातळीची मोजणी जिल्ह्याच्या भुजल सर्व्हेक्षण आणि विकास यंत्रणेकडून माहे मार्च २०२६ मध्ये केली आहे. गत ५ वर्षाच्या तुलनेत सरासरी ०.४९ मीटरने पाणीपातळी वाढली आहे. एकंदरीत, पाणी पातळी बरीच वर आल्याने याचा फायदा शेतकरीसह सामान्य नागरिकांची तहान भागविण्यासाठी होणार आहे.

**यंदा पाणीटँकरची मागणी कमी**

दरवर्षी मार्च-एप्रिल महिना आला की, जिल्हा परिषद अन् जिल्हा प्रशासनाकडून जिल्ह्यातील पाणीटंचाईवर बैठका होवून उन्हाळी पाणीपुरवठ्यासाठी पाणीटँकरचे नियोजन केले जाते. यंदाही याबाबतचा टंचाई आराखडा तयार करण्यात आला असला तरी यंदा जिल्ह्याच्या दाही दिशांना मुबलक पाणीसाठा असल्याने आजतागायत जिल्ह्यात अवघे एकच पाणीटँकर चालू असल्याची माहिती उपजिल्हाधिकारी (महसूल) लक्ष्मण कसेकर यांनी दिली. गतवर्षी याच महिन्यात २६ गावांना ३२ टँकरद्वारे पाणीपुरवठा होत होता. यंदा गतवर्षीच्याही तुलनेत चांगला पाऊस झाल्याने या महिन्यात अवघे एकच पाणीटँकर सुरू झाले आहे.

**जमिनीत पाणी मुरल्याने उन्हाळ्यात टंचाई जाणवत नाही**

प्रतिवर्षी उन्हाळ्यात जिल्हा प्रशासनाकडून जिल्ह्यातील पाणी टंचाईवर मात करण्यासाठी पाणीटँकर मोठ्या प्रमाणात वापरली जातात. यंदा मात्र अतिवृष्टी झाल्याने जमिनीत पाणी मोठ्या प्रमाणात मुरले असल्याने आगामी उन्हाळ्यात जिल्ह्यात कोठेही पाणीटंचाई जाणवणार नाही; असा आशावादही डॉ. शेख यांनी व्यक्त केला. तर शेतकरी बांधवांनी शेततळी आणि शहरवासियांनी बोअर पुनर्भरण करण्याचे आवाहनही डॉ. शेख यांनी केले. एकंदरीत, जिल्ह्याचा भुजलस्तर चांगला वाढल्याने याचा फायदा भविष्यात सर्वांनाच होणार असल्याचीही माहिती डॉ. शेख यांनी शेवटी दिली.

> **१५९ विहिरींच्या पाणीपातळीचे निरीक्षण**
>
> मार्च २०२६मध्ये जिल्ह्यातील १५९ इतक्या विहिरींच्या पाणीपातळीचे निरीक्षण केले होते. यामध्ये उत्तर सोलापूर ५, दक्षिण सोलापूर १५, बार्शी १५, अक्कलकोट २१, पंढरपूर १४, माळशिरस १५, मंगळवेढा ६, सांगोला १४, माढा १८, मोहोळ १३ आणि करमाळा २३ अशा १५९ विहिरींचे निरीक्षण केले होते. यामध्ये उत्तर सोलापूर ०.६३ मीटरने पाणीपातळी वर आली आहे. दक्षिण सोलापूर ०.६८ मीटर, बार्शी ०.६७, अक्कलकोट ०.१५, पंढरपूर ०.३८, माळशिरस ०.३१, मंगळवेढा ०.१७, सांगोला ०.५८, माढा तालुक्यात ०.६५ आणि करमाळा तालुक्यात ०.६१ मीटरने पाणीपातळी वर आली आहे.